**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- १०**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- २६/०३/२०१०

प्रति,
मा. ------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र. १० बुधवार दि. ३१/०३/२०१० रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिका.

**बुधवार दिनांक- ३१ /०३ /२०१० ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| १०८ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक ७ सोमवार दिनांक ११/०१/२०१०, मा.स्थायी समिती सभा क्रमांक ८ सोमवार दिनांक १५/०२/२०१० व मा.स्थायी समिती सभा क्रमांक ९ गुरूवार दिनांक २५/०२/२०१० रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणे |
| १०९ | श्री. चंद्रशेखर काशिनाथ तळेकर, बिगारी यांचेवर ठेवलेले आरोपी खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढुन टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ११० | श्री. धोंडीराम राधाजी घोरपडे, बिगारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा शिक्षा व अपिल नियम १९७९ मधील कलम ४ (२) मध्ये नमुद केल्यानुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५६ (३)नुसार म.न.पा. सेवेतुन बडतर्फ करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव. |
| १११ | मा.शासन निर्णय क्रमांक संर्किण १००५/वर्गीकरण/ प्र.क्र. ३७९/०५/नवि-२४, मंत्रालय, मुंबई दिनांक ४ मे २००६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे आस्थापना कायम सुचीवरील पद निर्मिती करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ११२ | अहमदनगर महानगरपालिकेचे केडगांव पाणी पुरवठा योजने करिता ६०० मी.मी. डी.आय.पाईप **ऐवजी** ६१० मी.मी. व्यासाचे मृदू, लोखंडी पाईप बसविणे, रेल्वे क्रॉसिंग करणे ही कामे अतिरिक्त बाबीचे अंतर्गत मंजूर एजन्सी मे.ॲक्वा पंपस् प्रा.लि.यांचे कडून पाईप पुरवठयासह करून घेणेस व त्याकामी येणारे रक्कम रूपये ४४,८०,८२३/-**व** रू. १४,८७,३४२/- चे जादाचे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ११३ | अहमदनगर महानगरपालिकेचे केडगांव पाणी पुरवठा योजने अंतर्गत पंपींग मशिनरीसाठी ट्रान्सफार्मर, ग्रॅन्ट्री व सलग्न कामे अतिरिक्त बाबीच्या दरसुची नुसार मे.ॲक्वा पंपस्,प्रा.लि. यांचेकडून करून घेण्यांस व त्यामुळे होणा-या जादाचे रक्कम रूपये १,७१,३१६/- चे खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

...२

| | |
|---|---|
| ११४ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे रोज होणा-या मेजर व मायनर ऑपरेशन करिता इच्छुक वैद्यकिय अधिकारी बधिरीकरण तज्ञांची तात्पुरत्या स्वरूपात प्रत्येक मेजर ऑपरेशन करिता रूपये ४००/-व प्रत्येक मायनर ऑपरेशन करिता रूपये २००/- याप्रमाणेचे मानधनावर दि.५/०१/२०१० ते दि.४/०७/२०१० अखेर सहामहिन्यांसाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करण्यांस मंजूरी मिळणबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ११५ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे बालरोग तज्ञ डॉ.श्री. सुभाष फिरोदिया, डॉ.श्री. अनिरूध्द गिते, व डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची दरमहा रूपये १५००/- चे मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात दिनांक २५/०२/२००९ ते २४/०६/२०१० अखेर सहा महिन्यांकरिता नेमणूक करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ११६ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील विघंन विहिरी दुरूस्ती कामी सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिता मागविण्यांत आलेल्या निविदा दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ११७ | अहमदनगर महानगरपालिकेचे रेकॉर्ड विभागामार्फत सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षासाठी लागणारे रजिस्टरे, फॉर्मस्, पावतीबुके इत्यादीची छपाई करून घेणे कामी वर्तमान पत्रामध्ये जाहिर निविदा प्रसिध्द करून जाहिर निविदा मागविणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ११८ | अर्जदार सौ. सय्यद तोहरा लतीफ घर नं.२४/१० मुकुंदनगर यांचे घराचे नळ कनेक्शन बंद केलेले असल्याने सन १९९८ ते २००९ अखेरचे रूपये १७,४४८/- चे नजर चुकीने त्यांना दिलेले बील निर्लेखित करण्यांस व कर्तव्यात कसुर करण्या-या संबंधीत कर्मचा-यावर शिस्तभंग कार्यवाही करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ११९ | अर्जदार श्रीमती मेहरून्निसा शेख बशीर, रा. दरबार कॉलनी मुकुंदनगर अहमदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना सन २००३ सालापासून दिलेले पाणी पट्टी रूपये १३,९४८/- चे बील निर्लेखित करण्यांस व संबंधीत कर्मचा-यावर कारवाई करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १२० | अर्जदार श्री. सुभाष शांताराम मधुरकर, रा. फकिरवाडा घर नं.८२ गौरवनगर, अहमदनगर यांचे घराचे नळ कनेक्शन बंद असतांना त्यांना दिलेले रूपये १२,२००/- चे पाणी पट्टीचे बील निर्लेखित करण्यांस व कर्तव्यात कसुर करणा-या संबंधीत कर्मचा-यावर कारवाई करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १२१ | अर्जदार श्री. शेख एजाज अब्दुल हक , रा. मुकुंदनगर, अहमदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना सन २००३-२००९ अखेर दिलेले रूपये ११,९९६/- चे पाणी पट्टी चे बील निर्लेखित करण्यांस व चुकीचे बील देणारे संबंधीत कर्मचा-यावर कारवाई करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १२२ | अर्जदार श्री. ब्रम्हदेव निवृत्ती पवार, रा.-वॉर्ड क्र. ३५ प्लॉट नं.६ नवीन गांवठाण केडगाव यांचे घरास एकच अर्धा इंची नळकनेक्शन दिलेले असल्याने त्यांना न दिलेल्या १/२" नळ कनेक्शनचे सन २००३ ते २००९ अखेर चे रूपये ९,०००/- चे पाणीपट्टीचे बील रद्द करण्यांस व त्याप्रमाणे रोकॅर्डला नोंद घेण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १२३ | अर्जदार श्री. अंबादास सखाराम शिंदे तर्फे श्रीमती पारूबाई अंबादास शिंदे, रा.- नेप्ती रोड केडगाव अर्चना हॉटेलचे मागे वॉर्ड क्रमांक ३९ यांचे घरास कुठल्याही प्रकारचे नळ कनेक्शन दिलेले नसल्याने त्यांना नजर चुकीने दिलेले सन १९९८ ते २००९ अखेर पाणीपट्टीचे रूपये १२,३७८/- चे दिलेले बील रद्द करण्यांस व त्याप्रमाणे रोकॅर्डला नोंद घेण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १२४ | अर्जदार श्री. ठकप्पा खंडु गवळी (काटकर) वॉर्ड क्र. २ घ.नं. ७५१ /५२ तोफखाना यांचे घरास दिलेल्या नळ कनेक्शनचे पाण्याचा वापर पिण्यासाठी होत असल्याने त्यांना दिलेल्या नळ कनेक्शनची जादा दराने लावलेली पाणीपट्टी पिण्याचे दराने लावणेस व तशी संगणक विभागाकडेस नोंद करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

...३

| | |
|---|---|
| १२५ | अहमदनगर महानगरपालिकेचे वसुली वॉर्ड क्र. ८६ व ८८ या दोनही वसुली वॉर्डचे रेकॉर्डला डॉ. रिजवाना सुलतान खान, डॉ. कमरून्नीसा आबदिखान, श्री. सय्यद इलीयास गफूर, श्री. महमंद हुसेन जहूर शेख, श्री. सलीमा इसहाक या मालमत्ता धारकांचे मालमत्तेची नजर चुकीने झालेल्या नोंदी पैकी वॉर्ड क्र. ८८ मधील नोंद रद्द करणेस व सन २००८-२००९ पासूनचा ओपन, प्लॉट वरील कर निर्लेखित करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ. |
| १२६ | अहमदनगर महानगरपालिकेस सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिता नारळी खराटे, मोलाचे कुंचे, पंरवाकृती गोलाकार झाडू इ. खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १२७ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ६२ मधील केडगांव येथील हरिजन वस्ती मध्ये स्त्रिया व पुरूषाकरिता प्रत्येकी पांच सिटचे शौचालय बांधणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १४,३७,५४३/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १२८ | अहमदनगर महानगरपालिकेचे अखत्यारितील पिंपळगाव माळवी तलावाचे बुडीत क्षेत्रात आढाववाडी ता. नगर या गावाचे पिण्याचे पाण्या करिता विघंन विहिर घेणेस ना हरकत परवानगी देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ. |
| १२९ | मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३१ दिनांक २८/७/२००९ अन्वये अहमदनगर महानगरपालिका हद्दीत नव्याने शहर वाहतुक बससेवा सुरू करणे कामी नेमलेल्या अभ्यास समितीने सादर केलेल्या अहवालासह बससेवा सुरू करणेबाबत अंतिम निर्णय घेणे करिता पूर्वीचे प्रस्तावासह ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**सोबत-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ७ सोमवार दिनांक ११/०१/२०१०, मा.स्थायी समिती सभा क्रमांक ८ सोमवार दिनांक १५/०२/२०१० व मा.स्थायी समिती सभा क्रमांक ९ गुरूवार दिनांक २५/०२/२०१० रोजीच्या इतिवृत्ताची प्रत व विषय-क्रमांक १०९ ते १२९ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- १०८ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - १०८ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ७ सोमवार दिनांक ११/०१/२०१०, मा.स्थायी समिती सभा क्रमांक ८ सोमवार दिनांक १५/०२/२०१० व मा.स्थायी समिती सभा क्रमांक ९ गुरूवार दिनांक २५/०२/२०१० रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर** :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक ७ सोमवार दिनांक ११/०१/२०१०, मा.स्थायी समिती सभा क्रमांक ८ सोमवार दिनांक १५/०२/२०१० व मा.स्थायी समिती सभा क्रमांक ९ गुरूवार दिनांक २५/०२/२०१० रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागिल सभांचे कार्यवृत्त कायम करणे आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- मागिल सभा दिनांक ११/०१/२०१०, दिनांक १५/०२/२०१०, दिनांक २५/०२/२०१० रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- मागिल तीनही सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मागिल सभा क्रमांक ७ सोमवार दिनांक ११/०१/२०१०, सभा क्रमांक ८ सोमवार १५/०२/२०१० व सभा क्रमांक ९ गुरूवार दिनांक २५/०२/२०१० रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ७ सोमवार दिनांक ११/०१/२०१०, मा.स्थायी समिती सभा क्रमांक ८ सोमवार दिनांक १५/०२/२०१० व मा.स्थायी समिती सभा क्रमांक ९ गुरूवार दिनांक २५/०२/२०१० रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- १०९ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - १०९ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. चंद्रशेखर काशिनाथ तळेकर, बिगारी यांचेवर ठेवलेले आरोपी खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढुन टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- कामगार विभाग दिनांक १४/८/२००९

आरोपीत कर्मचारी श्री. चंद्रशेखर काशिनाथ तळेकर, बिगारी यांचेवरील खातेनिहाय चौकशीबाबत

चौकशी अधिकारी :- श्री. आर.एम. ढाकणे, कामगार अधिकारी

चार्ज ऑफिसर :- श्री. उध्दव जी. म्हसे, उदयान विभाग प्रमुख

आरोपीत कामगार :- श्री. चंद्रशेखर काशिनाथ तळेकर, बिगारी

सादर,

आरोपीत कामगार श्री. चंद्रशेखर काशिनाथ तळेकर, बिगारी यांना आस्थापना आदेश ४२८९ दिनांक ३१/१/२००९ अन्वये आरोपपत्र क्र.४९ दि.१३/५/२००९ चे देण्यात आले त्याचा सारांश असा,

आपण दि.८/९/२००८ पासून वरिष्ठांची पुर्व परवानगी न घेता कामावर परस्पर गैरहजर आहात. सदरील आपल्या कृत्यामुळे महानगरपालिकेच्या कामाचा खोळंबा झालेला आहे.

असे आरोप आरोपीत कामगारावर आरोप पत्रात ठेवण्यात आले. आरोपीत कामगाराने आरोपपत्रास लेखी खुलासा दिलेला असुन चौकशी दरम्यान दि.१४/८/२००९ व दि .१७/८/२००९ रोजी समक्ष जबाब दिलेला आहे सदर मध्ये त्यांनी त्यांचेवर आरोपपत्रात ठेवलेले आरोप कबुल केले असुन, " माझ्या घरगुती वैयक्तिक वादामुळे मी कामावर हजर नव्हतो तरी मला एक वेळ माफ करून कमावर हजर करून घ्यावे अशी विनंती केली आहे "

आरोपीत कर्मचा-यांने त्याचेवर आरोपपत्रात ठेवलेले आरोप कबुल केलेले आहेत त्यामुळे ते शिक्षेस पात्र ठरत आहेत त्यांची नेमणुक तारीख १/११/१९८७ अशी असुन नेमणुक तारखेपासुन दि.८/९/२००८ पावेतो १५७३ दिवस वेळोवेळी कामावर गैरहजर आहे. तसेच त्यांना यापुर्वी १. आस्था. जा.क्र. १६७७ दि.६/६/२००० अन्वये दि. ९/१०/९९ ते हजर होईपर्यत असाधारण रजा धरून कामावर हजर करून घेण्यात येत आहे. २. आस्था. जा.क्र. ८१६६ दि.१/२/२००३ अन्वये एक वेळ कडक ताकीद देउन्न गैरहजर कालावधी असाधारण रजा ३. कामगार जा.क्र. ७९४ दि.१७/६/२००५ अन्वये गैरहजर कालावधी विनावेतनी व दोन वेतनवाढी पुढील वेतन वाढीवर परिणाम होणार नाही अशा रितीने रोखण्यात येत आहे. ४. कामगार जा.क्र. ६१ दि.१०/४/२००६ अन्वये गैरहजर कालावधी असाधारण रजा व तुम्हास मुळवेतनावर आणण्यात येत आहे. ५. कामगार जा.क्र. ४४८५ दि.३१/३/२००८ अन्वये गैरहजर कालवधी विनावेतनी व दोन वेतनवाढी पुढील वेतनवाढी कायमस्वरूपी रोखण्यात येत आहे. व रू. १००/- च्या स्टॅम्प पेपर वर परस्पर कामावर गैरहजर रहाणार नाही व चांगल्या वर्तणुकीचे हमी पत्र घेण्यात येत आहे. अशा शिक्षा करण्यात आलेल्या आहेत.

आरोपीत कर्मचा-यावरील आरोप शाबीत झालेले असल्याने त्यांचे विरूध्द शिक्षेचा निर्णय घेतांना त्यांना पूर्वी करण्यात आलेल्या शिक्षा याचा विचार करणे योग्य होईल तसेच त्यांचे दि. ८/९/२००८ पासूनच्या गैरहजेरीचा देखील निर्णय होणे आवश्यक आहे.

तरी आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे चौकशी अधिकारी यांचा अहवाल असे.

सादर, दि. १४/१०/२००९

आरोपीत कर्मचारी श्री. चंद्रशेखर काशिनाथ तळेकर यांना देण्यात आलेल्या आरोपाच्या खातेनिहाय चौकशी अंती दोषासिध्दी नंतर त्यांना जा.नं. कामगार २१५९ दि.३०/९/०९ अन्वये " मा.स्थायी समितीच्या मंजुरीने महापालिका सेवेतुन काढून टाकण्यात येत आहे" अशी शिक्षा का करणेत येवु नये या बाबत कारणे दर्शविणारी कारणे दाखवा नोटीस दिली असता, सदर कारणे दाखवा नोटीशीस त्यांनी दि.६/१०/२००९ रोजी उत्तर देउन "मला या प्रकारची शिक्षा झाल्यास माझे भविष्यात कधीही भरून न येणारे नुकसान होणार आहे व शिक्षेमुळे माझे कुटुंब उध्वस्त होणार आहे. माझ्या कुटुंबाची संपुर्ण जबाबदारी माझे नोकरीवर अवलंबून आहे. अशा प्रकारची चुक भविष्यात कधीही करणार नाही. तरी मला एकवेळ माफी देउन पुन्हा एकदा नोकरी करण्याची संधी दयावी "अशी विनंती केलेली आहे./**अ**

येणे प्रमाणे फेरसादर असे.

येणे प्रमाणे कामगार अधिकारी यांचा अहवाल असे. दि. २०/१०/०९

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- चर्चा करा.

चर्चा झाली

आरोपीत कर्मचारी यांनी कारणे दाखवा नोटीसीस दिलेला खुलासा समाधान कारक नाही. त्यांची एकूण गैरहजेरीची प्रवृत्ती व पूर्वी देण्यात आलेल्या शिक्षा पाहता त्यांना सुचविलेली शिक्षा करणे योग्य होईल. तरी सदरचे प्रकरण मुं.प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(१) (अ) अन्वये मा.स्थायी समितीस पाठवणे कामी मान्यतेस्तव सादर.

येणे प्रमाणे कामगार अधिकारी यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- "अ" प्रस्तावीत मा.स्थायी समितीचे मंजुरीसाठी पाठविणे करिता मान्यतेस्तव सादर. दि.१२/११/०९

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही .१३/११/०९

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे कर्मचारी श्री. तळेकर चंद्रशेखर यांना म.न.पा. सेवेतुन बडतर्फ करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- त्यांना एकवार संधी देण्यांत यावी.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत यावा.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत यावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- श्री. तळेकर यांना सभेमध्ये बोलावण्यात यावे.

त्याप्रमाणे श्री. तळेकर चंद्रशेखर,बिगारी हे सभे समोर उपस्थित झाले.

मा.सभापती साहेब :- किती दिवस गैरहजर आहात.

गार्डन विभाग श्री. म्हसे उध्दव जी.:- श्री. तळेकर हे दिड वर्ष गैरहजर राहिले आहेत.

मा.उपायुक्त (सा.)श्री. हांगे साहेब :- ऑफिस मध्ये गैहहजर का राहिलात.

श्री. तळेकर चंद्रशेखर :- वडील आजारी होते हार्ट अॅटक आला होता.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- रजा मिळणेसाठी अर्ज का दिला नाही.

गार्डन विभाग श्री. म्हसे उध्दव जी. :- श्री. तळेकर हे रजा उपभोगुन कामावर हजर झाले नंतर गैरहजर राहिले आहेत.

मा.सौ. ढोणे मा.सु.:- नोकरी मिळत नाही हे असे कसे वागतात.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- एकवार कडक ताकीद देण्यांत यावी.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब / मा.उपायुक्त (कर) डॉ.श्री. जावळे साहेब :- यांना कडक ताकीद देवुन, गैरहजेरी बीनपगारी करणे, इन्क्रनिट बंद करणे अशा सर्व शिक्षा प्रशासनाने केलेल्या आहेत. त्यांना म.न.पा. सेवेतुन बडतर्फ करणे अशी शिक्षा करणेस मंजूरी मिळणे करिता प्रस्ताव सभे पुढे सादर केलेले आहेत.

मा.श्री.गव्हाळे वि.ना.:-एकवार संधी देण्यांत यावी. श्री.तळेकर यांना कामावर हजर करून घ्यावे.

मा.श्री. पवार बा.रे.:- श्री. तळेकर यांना कामावर हजर करून घ्यावे. एक वेळ संधी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- एकवार संधी म्हणून त्यांना सर्वानुमते कामावर हजर करून घ्यावे. त्यांची गैरहजेरी बीनपगारी करण्यांत यावी.

**ठराव :-** श्री. चंद्रशेखर काशिनाथ तळेकर, बिगारी यांचेवर ठेवलेले आरोपी खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढुन टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढिल प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

आरोपीत कर्मचारी श्री. चंद्रशेखर काशिनाथ तळेकर, बिगारी यांना एक वेळ संधी म्हणून कामावर हजर करून घेण्यास मंजूरी देण्यांत येत आहे. त्यांचे गैरहजेरीचा कालावधी बीनपगारी करण्यांत यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- ११० बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - ११० बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. धोंडीराम राधाजी घोरपडे, बिगारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा शिक्षा व अपिल नियम १९७९ मधील कलम ४(२) मध्ये नमुद केल्यानुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५६(३) नुसार म.न.पा. सेवेतुन बडतर्फ करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** :- आस्थापना विभाग दिनांक ९/१०/२००९

विषय :- श्री. धोंडीराम राधाजी घोरपडे, बिगारी यांचा कामावर हजर करून घेणे बाबतचा अर्ज.

सादर,

विनंती रिपोर्ट की, श्री. धोंडीराम राधाजी घोरपडे, दि. २४/११/१९९५ पासून बिगारी पदी कायम कर्मचारी आहेत.

श्री.धोंडीराम राधाजी घोरपडे हेदि.६/४/२००८पासून कोणत्याही प्रकारचा रजेचा अर्ज न देता अथवा पुर्व परवानगी न घेता कामावर गैरहजर आहेत.त्यामुळे त्यांचे वेतन स्थगित करण्यात आलेले आहे.

श्री. घोरपडे बिगारी यांनी दि. १४/९/०९ रोजी अर्ज देवुन त्यांची सून लक्ष्मी विजय घोरपडे ही रात्रीच्या वेळी आंगावर रॉकेलची चिमणी पडून १८% भाजली होती. परंतु सदर घटनेमध्ये सुनेच्या आई वडीलांनी माझे विरोधात खोटी फिर्याद दाखल करून सदर घटनेस त्यांना जबाबदार धरून त्यानुसार मा. सेशन्स कोर्ट अहमदनगर यांचे समोर सेशन्स केस नं.१२५/२००७ चे कामकाज चालवुन त्यांना १० वर्षे सक्त मजुरी व ५ हजार रूपये दंड, दंड न भरल्यास पुन्हा १ वर्षाची शिक्षा अशी शिक्षा देण्यात आली आहे. त्यानुसार त्यांना दि.६/३/२००७ रोजी अटक करण्यात येवुन दि.१८/६/२००७ रोजी जामीन वर सोडण्यात येवुन पुन्हा दि.५/४/०८ रोजी अटक करण्यात आली.

मा. सेशन्स कोर्ट, अहमदनगर यांचे सेशन्स केस नंबर १२५/२००७ मधील निकाला विरोधात त्यांनी मुंबई हाय कोर्टाचे औरंगाबाद खंडपिठा पुढे क्रिमीनल अपिल नं.६४६/२००८ दाखल केले सदर केस मध्ये मा. औरंगाबाद खंडपिठाने दि. २६/६/०९ रोजी निकाल देवुन श्री. धोंडीराम राधाजी घोरपडे यांनी सदर गुन्ह्या मध्ये न्यायदानाचे प्रक्रिये दरम्यान १८ महिन्यांचा कारावास भोगला असल्याने तसेच त्यांच्या सुनेने त्यांचेवरील आरोप मा. औरंगाबाद खंडपिठा पुढे मा. सेशन्स कोर्ट अहमदनगर यांचे निकालानुसार्ची भरपाई स्वीकारून मागे घेतल्याने ते जेवढा कालावधी कारावासात होते तेवढा कालावधी शिक्षा देवुन मुक्त करण्याचे आदेश दिले. त्यामुळे त्यांचेवरील आरोप खोटे असल्याने कामावर हजर करून घेणे बाबत विनंती केलेली आहे.

श्री. घोरपडे, बिगारी यांनी अर्जामध्ये नमुद केलेली परिस्थिती पहाता तसेच मा. सेशन्स कोर्ट, अहमदनगर यांचे दिलेल्या आदेशानुसार त्यांना १० वर्ष सक्त मजुरी व ५ हजार रूपये दंड, दंड न भरल्यास पुन्हा १ वर्षाची शिक्षा अशी शिक्षा दिल्यामुळे व मा. औरंगाबाद खंडपिठाचे दि.२६/६/०९ रोजीच्या निकालानुसार श्री. घोरपडे, बिगारी यांनी भोगलेली शिक्षा कायम ठेवुन मुक्त केलेले आहे. तसेच श्री. घोरपडे, बिगारी यांनी सदर घटने बाबत अर्जाच्या दिनांकापर्यत कार्यालयास कळविलेले नाही किंवा आरोग्य विभागाकडून ही कुठल्याही प्रकारचा अहवाल इकडेस प्राप्त झालेला नाही.

तरी सदरची परिस्थिती पहाता श्री. घोरपडे, बिगारी यांनी मा. सेशन्स कोर्ट, अहमदनगर यांचे आदेशाची सत्यप्रत व मा. औरंगाबाद खंडपिठ यांचे आदेशाची सत्यप्रत सादर केलेली नसल्याने सदर दोन्ही निकालाच्या सत्य प्रतीची मागणी संबंधीतांकडून करणे उचित वाटते तसेच सदर बाबत अहमदनगर महानगरपालिकेचे विधीसल्लागार यांचे मत मागवुन कारवाई करणे उचित वाटते आदेशार्थ सादर. **/अ**

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.दि.२१/१०/०९

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- **"अ"** प्रस्तावीत पाहता १) एवढे दिवस कर्मचारी गैरहजर असताना देखील आरोग्य विभागातील संबंधीत जबाबदार अधिका-याने या बाबत कोणत्याही प्रकारच्या Report सादर केला नाही. त्याबद्दल संबंधीत अधिकारी यांना शोकॉज नोटीस द्यावी. २) म.न.पा.चे विधीतज्ञ यांचा सदर प्रकरणी सल्ला मागवून प्रकरण फेर सादर करावे.

--**--

आस्थापना विभाग
दि.१९/११/०९

विषय: श्री. धोंडीराम राधाजी घोरपडे, बिगारी यांचा कामावर हजर करून घेणे बाबत अर्ज.

**फेर सादर,**

विनंती रिपोर्ट की, श्री. धोंडीराम राधाजी घोरपडे, यांचे विरूध्द त्यांचे सुनाचे जळीत प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता त्यानुसार त्यांना दि.६/३/०७ रोजी अटक करून दि.१८/०६/०७ रोजी जामीनवर सोडण्यात आले होते. त्यानंतर मा. सेशन्स कोर्ट,अहमदनगर यांचे समोर दाखल केलेली सेशन्स केस नंबर १२५/२००७ अन्वये १० वर्ष सक्त मजुरी व ५ हजार रूपये दंड,दंड न भरल्यास पुन्हा १ वर्षाची शिक्षा अशी शिक्षा देण्यात आली आहे. त्यानुसार त्यांना पुन्हा दि.५/४/०८ रोजी अटक करून दि.९/७/०९ रोजी मुक्त केलेले आहे.

तद्नंतर श्री. घोरपडे, बिगारी यांनी वरील आदेशाविरोधात मुंबई हायकोर्टाचे औरंगाबाद खंडपिठा पुढे क्रिमिनल अपिल नंबर ६४६ /२००८ दाखल केल्याने मा. औरंगाबाद खंडपिठाने दि.२६/६/०९ रोजी निकाल देवुन श्री. घोरपडे यांनी सदर गुन्हया मध्ये न्यायदानाचे प्रक्रिये दरम्यान १८ महिन्याचा कारावास भोगला असल्याने तसेच त्यांचे सुनेने मा. न्यायालयाचे आदेशानुसारची भरपाई स्वीकारून केस मागे घेतल्याने ते जेवढा कालावधी कारावासात होते. तेवढा कालावधी शिक्षा देवुन मुक्त करण्यात आलेले आहे. त्यामुळे श्री. घोरपडे यांनी कामावर हजर करून घेणेबाबत विनंती अर्ज केला होता. त्यानुसार श्री. घोरपडे यांना कामावर हजर करून घेणे बाबत महानगरपालिकेचे विधीसल्लागार यांचे मत मागविले असता त्यांनी खालील प्रमाणे मत दिलेले आहे.

"वर नमुद विषया संबंधीचे कागदपत्राचे आवलोकन केले श्री. धोंडीराम राधाजी घोरपडे यांना से.के. नंबर १२५/०७ मध्ये कलम ३०७ अन्वये दोषी धरून मा.जिल्हा व सत्र न्यायालयाने १० वर्ष सक्त मजुरी, ५ हजार रूपये दंड वगैरे बाबतची शिक्षा दिली होती त्यानंतर सदर निर्णया विरूध्द श्री. धोंडीराम घोरपडे यांनी मा.ना. उच्च न्यायालय मुंबई खंडपिठ औरंगाबाद येथे क्रिमिनल अपिल नंबर ६४६ /०८ चे दाखल केले त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक २६/६/०९ रोजी निर्णय देवुन जिल्हा व सत्र न्यायालाने दिलेली शिक्षा कमी करून धोंडीराम घोरपडे यांनी १८ महिने तुंरूगातील भोगलेली कारावासची शिक्षा कायम ठेवुन अपिल निकाली काढलेले आहे. मात्र ना.उच्च न्यायालय मुंबई खंडपिठ औरंगाबाद यांनी श्री. धोंडीराम राधाजी घोरपडे, यांना निर्दोष मुक्त केलेले नाही. त्यास दोषी धरलेले आहे परंतु शिक्षा कमी केलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा मधील शिक्षा व अपिल १९७९ मधील भाग २ मधील कलम ४ मधील २ पहाता तरतुदीचा विचार केला असता श्री. धोंडीराम राधाजी घोरपडे हे दोषी ठरलेले असल्यामुळे त्यांना कामावर हजर करून घेता येणार नाही.

महाराष्ट्र नागरी सेवा नियमा मधील शिक्षा व अपिल १९७९ कलम ४ मधील दोन मध्ये तो सिध्दापराध ठरून त्याला ४८ तासाहून अधिक मुदतीच्या कारावयासाची शिक्षा झाली असेल आणि अशा अपराध सिध्दीनंतर त्याला लगेच बडतर्फे केले नसेल किंवा सेवेतून काढले नसले किंवा सक्तीने सेवेतून सेवा निवृत्त केले नसेल तर त्याच्या अपराध सिध्दीच्या दिनांकापासून नियुक्ती प्राधिकरणाच्या आदेशाद्वारे निलंबनाधिन ठेवले असल्याचे मानले जाईल.

तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५६(३) नुसार कोणत्याही अधिका-यास किंवा कर्मचा-यास या कलमान्वये खालच्या पदावर आणने, सेवेतुन काढून टाकणे किंवा बडतर्फे करणे या विरूध्द कारण दाखविण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय अशा रितीने खालच्या पदावर आणता येणार नाही, सेवेतुन काढून टाकता येणार नाही किंवा बडतर्फ करता येणार नाही परंतु हे पोट कलम पुढील बाबतीत लागू होणार नाही.

जेव्हा एखादया व्यक्तीला तीच्या वर्तणुकीमुळे फौजदारी आरोपावरून सिध्द अपराध ठरविल्या मुळे खालच्या पदावर आणले असेल, सेवेतुन काढुन टाकले असेल किंवा बडतर्फ केले असेल किंवा जेव्हा सक्षम प्राधिका-याने लेखी नमुद करावयाच्या कारणास्तव एखादया व्यक्तीला कारण दाखवण्याची संधी देणे वाजवी रित्या व्यवहारोग्य नाही या विषयी सक्षम प्राधिका-याची खात्री झाली असेल तर सेवेतुन काढुन टाकता येईल किंवा बडतर्फ करता येईल" असे नमुद केलेले आहे.

तरी मा. मुंबई हाय कोर्टाचे औरंगाबाद खंडपिठाने श्री. घोरपडे बिगारी यांची त्यांनी भोगलेली शिक्षा कायम ठेवुन मुक्त केल्यामुळे तसेच मनपा विधीसल्लागार यांचे मतानुसार श्री. घोरपडे यांना कामावर हजर करून घेता येणार नाही असे कळविल्याने महाराष्ट्र नागरी सेवा शिक्षा व अपिल नियम १९७९ मधील कमल ४ (२) मध्ये नमुद केल्यानुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५६(३) नुसार श्री. घोरपडे बिगारी यांना सेवेतुन कमी करणे अथवा बडतर्फ करणे बाबत रिपोर्ट पुढील आदेशार्थ सादर.**/अ**

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख्य यांचा अहवाल असे. दि. १८/१२/०९

सामान्य प्र.वि. (विभाग प्रमुख ) :- श्री. घोरपडे धोंडीराम राधाजी बिगारी यांना नोकरीतून,सेवेतुन कमी करणे अथवा बडतर्फ करणे बाबतची कार्यवाही करणे पूर्वी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव सादर करणे बाबत आदेशार्थ सादर. दि.१८/१२/०९ / **अ**

मा.उपायुक्त (सा) साहेब :- आरोग्य विभागातील संबंधीत कर्मचा-यास लेखी विचारणा **"अ"** बाबत करणेत आली आहे काय ? दि.२४/१२/०९

--**--

आस्थापना विभाग
दि. २८/१२/०९

विषय :- श्री. धोंडीराम राधाजी घोरपडे , बिगारी यांचा कामावर हजर करून घेणे बाबत अर्ज.

**फेर सादर,**

विनंती रिपोर्ट की, श्री. धोंडीराम राधाजी घारेपडे, बिगारी यांचे प्रकरणी आस्था.जा.क्र. २४६४ दि.३०/१०/०९ अन्वये मा. आरोग्याधिकारी अहमदनगर महानगरपालिका यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली होती.त्यानुसार त्यांनी दिनांक १७/१२/०९ अन्वये खालील प्रमाणे खुलासा सादर केलेला आहे.

१.श्री. धोंडीराम राधाजी घोरपडे, बिगारी हे दिनांक ५/३/०७ पासून गैरहजर असुन दि.२०/३/०७ रोजी मुख्य स्वच्छता निरिक्षक श्री. एन.एस.वाघ यांचे कडून आलेल्या प्रस्तावाप्रमाणे मा. उपायुक्त साहेब यांचे मंजुरीने दिनांक ५/३/०७ पासून कामावर हजर होईपर्यत बिनपगारी रजा करण्या बाबतचा प्रस्ताव जा.क्र. आरोग्य २९५९ दि.२३/३/०७ ने आस्थापना विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे.

२. सदर कर्मचा-यास अटक केल्या प्रकरणी मा.सेशन कोर्टात त्यांचे विरूध्द केस दाखल करणे संदर्भात, जामीनावर सोडले बाबत किंवा मा. औरंगाबाद खंडपिठात अपिल दाखल करण्या संदर्भात मला कोणीही लेखी अगर तोंडी स्वरूपात आवगत करून दिलेले नाही. त्यामुळे मी या बाबत अनभिज्ञ असुन त्यामुळे या संदर्भात कुठलाही अहवाल देण्याची शक्यता नव्हती.

३. सदर कर्मचारी तत्कालीन झोन क्र.६ मध्ये दिनांक ३/८/०८ पासून कामावर हजर झाल्याबाबत मस्टर विभागाकडील हजेरीपत्रक पहाता दिसुन येते, या संदर्भात वरिष्ठांची मंजुरी घेणे आवश्यक होते मात्र या बाबत झोन प्रमुख, मुख्य स्वच्छता निरिक्षक व स्वच्छता निरिक्षक श्री. भोर यांचे कडून प्रस्ताव सादर केलेला दिसुन येत नाही जर आस्थापना विभागाकडे परस्पर प्रस्ताव सादर केला किंवा कसे हे मला माहित नाही, त्यामुळे माझेकडून प्रस्ताव देणे शक्य नव्हते.

४. सदर कर्मचारी दि.३/४/०७ ते ५/४/०८ पर्यत वेळोवेळी हजेरी गैरहजेरी व तद्नंतर दि.६/४/०८पासून दि.५/११/०९ पर्यत गैरहजेरी बाबत संबंधीत झोन मधील स्वच्छता निरिक्षक श्री. भोर यांचेकडून वेळोवेळी मस्टर विभागामार्फत आस्थापना विभागात पाठविल्याचे हजेरी पत्रकावरून दिसून येते.

मा. आरोग्याधिकारी यांचा खुलासा पहाता त्यांचे खुलाश्या मध्ये सदर कर्मचा-यास अटक केल्या प्रकरणी मा. सेशन कोर्टात केस दाखल करणे, त्यांना जामीनावर सोडले बाबत किंवा मा. औरंगाबाद खंडपिठात अपिल दाखल करण्या संदर्भात मला कोणीही लेखी अगर तोंडी स्वरूपात अवगत केले नसले बाबत कळविले आहे. तसेच मुद्दा क्र.४ नुसार श्री.बी.एच.भोर स्वच्छता निरिक्षक यांनी वेळोवेळी हजेरी गैरहजेरी बाबत. मस्टर विभागामार्फत आस्थापना विभागास कळविले बाबत नमुद केलेले आहे. परंतु मस्टर विभागाने फक्त पगार स्थगित ठेवणे बाबत कळविलेले आहे. गैरहजेरी बाबत कळविलेले नाही.

तसेच सदर कर्मचा-याचे प्रदिर्घ गैरहजेरी बाबत झोन प्रमुख / मुख्य स्वच्छता निरिक्षक यांचेकडून कुठल्याही प्रस्ताव मा. आरोग्याधिकारी यांचेकडे सादर केला नसले बाबत कळविले आहे.

तरी आरोग्याधिकारी यांचा खुलासा पहाता संबंधीत झोन प्रमुख व मुख्य स्वच्छता निरिक्षक व स्वच्छता निरिक्षक यांचे कडून श्री. घोरपडे, बिगारी यांचे गैरहजेरी बाबत कोणताही अहवाल प्राप्त नसल्याने मा. मुंबई हायकोर्टाचे औरंगाबाद खंडपिठाने श्री. घोरपडे बिगारी यांची त्यांनी भोगलेली शिक्षा कायम ठेवुन मुक्त केल्यामुळे तसेच मनपा विधीसल्लागार यांचे मतानुसार श्री. घोरपडे यांना कामावर हजर करून घेता येणार नाही. असे कळविल्याने महाराष्ट्र नागरी सेवा शिक्षा व अपिल नियम १९७९ मधील कलम ४(२) मध्ये नमुद केल्यानुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५६(३) नुसार श्री. घोरपडे, बिगारी यांना सेवेतुन कमी करणे अथवा बडतर्फ करणे बाबत रिपोर्ट पुढील आदेशार्थ सादर. **/अ**

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे. दि.३०/१२/०९

सामान्य प्र.वि. (विभाग प्रमुख ) :- सादर, सदर प्रकरणी श्री. भोर, स्वच्छता निरिक्षक यांची खाते निहाय चौकशी करणेत येवुन सदरचा प्रस्ताव "**अ**" प्रमाणे कार्यवाही करण्यास्तव मा.स्थायी समिती सभे पुढे आदेशार्थ सादर करणे योग्य राहील आदेशार्थ सादर. दि.३०/१२/०९

मा.उपायुक्त (कर) साहेब :- मनपा अभियोक्ता यांचे अभिप्रायानुसार प्रस्तावीतबाबत कार्यवाही करणे योग्य या बाबतचा रितसर प्रस्ताव मा.स्थायी समिती समिती समोर मु.प्रां. म.न.पा. अधिनियम १९४९ ५६(३) नुसार सादर करणेत योग्य सबब अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणेच्या मान्यतेस्तव सादर दि.१२/०१/१०/**अ**

मा.आयुक्त साहेब :- प्रस्तावीत मान्य दि. १५/०१/१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. धोंडीराम राधाजी घोरपडे, बिगारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा शिक्षा व अपिल नियम १९७९ मधील कलम ४(२) मध्ये नमुद केल्यानुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५६(३) नुसार म.न.पा. सेवेतुन बडतर्फ करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत यावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- श्री. घोरपडे यांना सभे समोर बोलावण्यांत यावे.

त्याप्रमाणे बिगारी श्री. घोरपडे धोंडिराम राधाजी सभे समोर उपस्थित झाले.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- कामावर गैरहजर का होता.

श्री. घोरपडे धोंडीराम राधाजी :- माझ्या सुनेच्या घरच्यांनी माझ्यावर बिनाकारण आरोप ठेवला होता. सुन अपघाताने भाजली होती.

मा.श्री.कांबळे र.द.:- किती दिवस सजा भोगली आहे.

मा.सभापती साहेब :- बिगारी श्री. घोरपडे यांनी एकूण आठरा महिने कारावास भोगलेला आहे.

मा.श्री.कांबळे र.द. :- मे.कोर्टाने त्यांना निर्दोष सोडलेले नाही. त्यांनी आठरा महिने सजा भोगलेली आहे. त्यांना बडतर्फ करण्यांत यावे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- बडतर्फ करण्यांत यावे.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार श्री. घोरपडे धोंडीराम राधाजी यांना सर्वानमुते म.न.पा. सेवेतुन बडतर्फ करण्यांत यावे.

**ठराव :-** श्री. धोंडीराम राधाजी घोरपडे, बिगारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा शिक्षा व अपिल नियम १९७९ मधील कलम ४(२) मध्ये नमुद केल्यानुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५६(३) नुसार म.न.पा. सेवेतुन बडतर्फ करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. कांबळे रवी दगडू.

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०

विषय क्रमांक- १११ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - १११ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** मा.शासन निर्णय क्रमांक संर्किण १००५/वर्गीकरण / प्र.क्र.३७९/०५/नवि-२४, मंत्रालय, मुंबई दिनांक ४ मे २००६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे आस्थापना कायम सुचीवरील पद निर्मिती करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- आस्थापना विभाग दिनांक १६/२/२०१०

विषय :- आस्थापना कायम सुचिवरील पद निर्मिती करणे बाबत.

संदर्भ :-शासन निर्णय क्र. संर्किण- १००५/वर्गीकरण / प्र.क्र.३७९/०५/नवि-२४ मंत्रालय, मुंबई दिनांक ४ मे २००६

सादर,

विनंती अहवाल सविनय सादर करण्यांत येतो की, तत्कालीन नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर होवुन ७ वर्षाचा कालावधी होत आहे. तत्कालीन नगरपरिषदेच्या आस्थापने वरील अधिकारी / कर्मचारी सध्या त्यांचेकडील असलेले कामकाज पाहुन इतर पदांचा अतिरिक्त कार्यभार पहात आहेत.

अहमदनगर महानगरपालिकेमध्ये रूपांतर होणेपुर्वी शहराची हद्दवाढ होते वेळी बुरूडगांव, केडगांव, नागापुर, बोल्हेगांव, फकिरवाडा इत्यादी ५ ग्रामपंचायत मधील भागाचा समावेश झालेला असुन अहमदनगर शहराचा अंदाजे ८८ चौ.कि. मीटर इतका मोठा विस्तार असुन दैनंदिन कामकाजामध्ये वाढ झालेली आहे. सद्यस्थितीमध्ये नियत वयोमानानुसार / स्वेच्छा सेवानिवृत्तीने वर्ग-२ व ३ चे अधिकारी सेवानिवृत्त झालेले असल्याने वर्ग-२ व ३ च्या अधिका-यांची संख्या अपुरी आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमधील अधिकारी / कर्मचारी यांचे प्रारूप सेवा प्रवेश निमय आकृतीबंध मा. शासनाने पाठविलेल्या प्रारूप आकृतीबंधानुसार तयार करण्यांत आलेला असुन सदरचा आकृतीबंध मा. महासभेकडे मंजुरीसाठी सादर करण्यांत आलेला आहे. त्यास अद्याप पावेतो मंजुरी मिळालेली नाही. सदर आकृतीबंधास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर मा. शासनास मंजुरीसाठी पाठविण्यांत येईल.

उपरोक्त ठरावात नमुद केल्याप्रमाणे मा. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक संर्किण १००५/वर्गीकरण / प्र.क्र. ३७९ /०५/नवि-२४ दिनांक ४ मे २००६ नुसार महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिकांचे वर्गीकरण आणि त्या आधारे महानगरपालिका सेवांची ३ सेवेत विभागणी करून ३८ अधिका-यांच्या पदांसाठी आकृतीबंध निश्चित करणेबाबत निर्देशीत केलेले आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद (२) नुसार "महानगरपालिकांच्या वर्गीकरणाद्वारे मुंबई महानगरपालिका वगळुन २० महानगरपालिकांमधील सेवांची परिशिष्ठ १ प्रमाणे (१) प्रशासकीय सेवा (२) लेखा सेवा (३) तांत्रिक सेवा या तीन सेवांमध्ये विभागणी करण्यांस आणि परिशिष्ठ २ प्रमाणे महानगरपालिकेच्या सेवेतील ३८ संवर्गातील अधिका-यांच्या पदांचे पदनाम, पदसंख्या व वेतनश्रेणी यांचा आकृतीबंध निश्चितीसाठी (मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५,४६,४७,५१,५३,५४ व ३४६ ते ३४८ आणि नागपुर शहर महानगरपालिका अधिनियम १९४८च्या कलम ४९,५०,५१ अन्वये प्राप्त अधिकारांतर्गत ) या आदेशान्वये शासनाची मान्यता देण्यांत येत आहे "

सद्यस्थितीमध्ये महानगरपालिकेमध्ये खालील महत्वाची पदे रिक्त झालेली असुन सध्या कार्यरत असलेल्या कर्मचा-यांवर अतिरिक्त पदभार सोपविण्यांत आलेला आहे.

| अ.नं. | पदांचे नावं | पद संख्या | वेतनश्रेणी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | शहर अभियंता | १ | १०६५०-१५८५० | प्रतिनियुक्तीने |
| २ | वैद्यकीय अधि. | २ | ८०००-१३५०० | सरळसेवा |
| ३ | सिव्ही. इंजिनियर | १ | ८०००-१३५०० | पदोन्नतीने |
| ४ | कामगार अधिकारी | १ | ७४५०-११५०० | पदोन्नतीने |
| ५ | प्रशा. अधिकारी | १ | ७४५०-११५०० | पदोन्नतीने |
| ६ | नगर सचिव | १ | ६५००-१०५०० | सरळसेवा |
| ७ | कनिष्ठ अभियंता | २ | ६५००-१०५०० | पदोन्नतीने |
| ८ | हेडक्लार्क | १ | ६५००-१०५०० | पदोन्नतीने |
| ९ | ऑडीटर | १ | ६५००-१०५०० | पदोन्नतीने |
| १० | मराठी स्टेनो | १ | ५५००-९००० | सरळसेवा |
| ११ | असि.टु.अकौंटट | १ | ५५००-९००० | पदोन्नतीने |
| १२ | आस्थापना प्रमुख | १ | ५५००-९००० | पदोन्नतीने |
| १३ | सॅनि. इन्स्पेक्टर | १ | ५०००-८००० | सरळसेवा |

त्यामुळे संदर्भिय आदेशामध्ये नमुद केलेल्या ३८ पदापैकी खालील तक्त्यांत दर्शविल्यानुसार पदांची आवश्यकता आहे.

| अ.नं. | पदांचे नावं | पद संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | उप संचालक नगररचना | १ | १०६५०-१५५०० |
| २ | कार्यकारी अभियंता | २ | १०६५०-१५५०० |
| ३ | मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी | १ | ८०००-१३५०० |
| ४ | उप अभियंता | ३+१ | ८०००-१३५०० |
| ५ | उप अभियंता (पा.पु.) | १ | ८०००-१३५०० |
| ६ | सहाय्यक संचालक नगररचना | १ | ८०००-१३५०० |
| ७ | सहाय्यक आयुक्त | ३ | ६५००-१०५०० |
| ८ | सहाय्यक मुल्य निर्धारक करसंकलन अधिकारी | १ | ६५००-१०५०० |
| ९ | सुरक्षा अधिकारी | १ | ६५००-१०५०० |
| १० | उप मुख्य लेखा परिक्षक | २ | ६५००-१०५०० |

तथापी महानगरपालिकांचे वर्गीकरण व ३८ अधिकारी संवर्गातील पदांचा आकृतीबंध निश्चित करतांना महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चावर नियत्रंण राहण्यासाठी जास्तीत जास्त ३५% एवढी खर्च मर्यादा ठेवण्यांत आलेली आहे. आस्थापना खर्चामध्ये वेतन, निवृत्तीवेतन, कार्यालयीन खर्च, वाहन इंधन, स्टेशनरी, बैठकावरील खर्च, दुरूस्ती, महानगरपालिकेतील आउट्स सोर्सींग मार्फत होणारी कामे यासाठी महापालिकेस होणारा खर्च याचा देखील समावेश राहील. आस्थापना खर्च ३०% पेक्षा अधिक झाल्यास महानगरपालिकेने अत्यावश्यक असेल अशी परिस्थिती वगळता नवीन पद निर्मितीचे प्रस्ताव शासनाकडे पाठवु नयेत असे संदर्भित आदेशामध्ये नमुद केलेले आहे.

वरील आवश्यक ती पदे मा. महासभेकडे सादर करणेत आलेल्या प्रारूप आकृतीबंधामध्ये समाविष्ठ असुन मा. शासनाच्या मंजुरीनंतर सदर आकृतीबंधामधुन सदरची मंजुर पदे वगळणे आवश्यक आहे. आस्थापना खर्चाची टक्केवारी सन- ०८-०९ मध्ये ५७.६०% इतकी आहे. सदरची पदे भरतांना त्यासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता ही शासनाच्या मॉडेल सेवा प्रवेश नियमाप्रमाणे धरून त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करणे उचित वाटते.

वरील सर्व पदांच्या निर्मितीमुळे आस्थापना खर्चात भर पडणार असल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ नुसार महापालिकेच्या मंजुरीने मा. शासनास प्रस्ताव पाठविणे आवश्यक आहे. तरी त्याप्रमाणे निर्णयासाठी आदेशार्थ सादर. **/अ**

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

सहा. आयुक्त :- सहमती दर्शक सही दि.३/३/२०१०

मुख्य लेखा परिक्षक :- रजेवर

मुख्य लेखा अधिकारी :- प्रस्तावात नमूद केलेली अ.क्र. १ ते १० पदे (पान क्र.२) निर्मितीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य. दि.२२/३/१० / **अ**

मा.उपायुक्त (सा.)साहेब :-**"अ"** प्रस्तावीत मा.स्थायी समितीकडे मंजुरीसाठी ठेवणे करिता मान्यतेस्तव सादर. दि.२५/०३/२०१०

मा.आयुक्त साहेब :- मा.स्थायी समिती पुढे पाठवा. दि.२५/०३/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे आस्थापना कायम सुचीवरील पद निर्मिती करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत यावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सौ. ढोणे मा.सु.:- मागील स्थायी समिती क्रमांक सभा २ दिनांक २८/७/२००९ विषय क्रमांक ९ तसेच स्थायी समिती सभा क्रमांक ४ दिनांक २५/८/२००९ विषय क्रमांक ५२ रोजी ठराव होउन तोच प्रस्ताव दुरूस्तीसह सादर करणेचा आदेश ठरावात नमूद केलेला आहे. परंतु असे असतांना वरील पूर्वीच्या ठरावामध्ये कोणतीही दुरूस्ती करणेत आलेली नाही व नव्याने प्रस्ताव मांडणेत आल्याचे दिसते. सदरची बाब स्थायी समितीच्या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे दिसून येते. त्यामुळे सदरचा विषय तत्काळ रद्द करून पूर्वीच्या स्थायी समितीच्या ठरावाचे तंतोतंत पालन करून सविस्तर विषय पुढील सभेत घेणेत यावा ही विनंती.

आजच्या विषयांत काही दोष आढळून येतात. आजच्या १] भारतीय राज्य घटनेच्या ७४ घटना दुरूस्ती नुसार तसेच मनपा कलम २९ अ नुसार प्रभाग समित्यांची निर्मिती करणेत आलेली आहे. मात्र आजच्या विषयांत प्रभाग अधिकारी हे अत्यंत महत्वाचे पद निर्मितीचा कोठेही उल्लेख नाही. २] मा. सुप्रिम कोर्टाने घनकचरा व्यवस्थापन विभागाबाबत काही अत्यावश्यक पदे निर्माण करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. अशा आवश्यक पदांचा देखील आजच्या विषयांत उल्लेख नाही. ३] नगर परिषदेतील आस्थापना सुचिवरील काही पदे उदा. सिव्हील इंजिनिअर हे पद आज प्रस्तावीत विषयातील उपअभियंता या पदाशी समतुल्य दिसून येते. अशा वेळेस पूर्वीचे पद रद्द करावयाचे किंवा नवीन पदामध्ये समावेशाने वर्ग करावयाचे

याचा कोठेही उल्लेख नाही.४] मागील स्थायी समितीच्या प्रस्तावामध्ये सहाय्यक आयुक्त कर असे पद विचाराधीन आहे असे असतांना आजच्या विषय सुचीमध्ये कर संकलन अधिकारी असे दोन पदे निर्माण करणेबाबतचा विषय दिसून येतो.५] उपमुख्य लेखा परिक्षक या पदाची शासन निर्णयानुसार "ड"वर्ग महानगरपालिकेला फक्त एकच पद संख्या मंजूर असतांना अनुक्रम १०मध्ये दोन पदाची आवश्यकता दाखविणेत आली आहे.यामुळे शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करून आम्हा सदस्यांच्या लक्षात येणार नाही अशीच प्रशासनाची धारणा दिसते.

त्यामुळे मागील स्थायी समितीचा आदेशाचा अवमान करणारा व दिशाभूल करणारा अपूर्ण असलेला आजचा विषय रद्द करून मागील स्थायी समितीच्या ठरावाची अंमलबजावणी करणे बाबतचा ठराव पारीत करणेत यावा. ही विनंती.

आस्थापना प्रमुख श्री.अशोक साबळे :-मा.स्थायी समिती सभा क्रमांक २ विषय क्र.९ दिनांक २८/७/२००९ अन्वये तहकुब ठेवण्यांत आलेल्या प्रस्तावावर मा.स्थायी समिती सभा क्रमांक ४ विषय क्र. ५२ दिनांक २५/८/२००९ अन्वये "अहमदनगर महानगरपालिकेचे आस्थापना कायम सुचीवर विविध पदे निर्माण करणे बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये मा.सदस्यांनी सुचविलेल्या सुचनाप्रमाणे दुरूस्त्या करून प्रस्ताव पुढील सभेमध्ये निर्णयासाठी सादर करण्यांत यावा." अशा बाबत ठराव पारित करणेत आलेला आहे. त्याप्रमाणे सुधारित प्रस्ताव तयार करून मा.स्थायी समिती सभेपुढे मंजूरीसाठी लवकरच सादर करणेत येईल.

मा.श्री.पवार बा.रे.:-आलेल्या ऑफिस रिपोर्टानुसार आवश्यक त्या पदाची निर्मिती करणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- महानगरपालिकामधील सक्षम कर्मचा-यांना पदोन्नती का देण्यांत येत नाही.

मा.उपायुक्त (सा.)श्री.हांगे साहेबः- मा.सभेने हा प्रस्ताव मंजूर केल्यानंतर तो महानगरपालिकेचे महासभेमध्ये मंजूर होवुन मा.शासनाकडेस मान्यतेसाठी पाठविण्यांत येणार आहे.मा.शासनाने मंजूरी दिल्या नंतरच सदर पदास पात्र असलेल्या महानगरपालिकामधील उमेदवारांना पदोन्नती देणेत येईल.

मा.श्री.पवार बा.रे.:- आस्थापना खर्च किती वाढणार आहे. आपले महानगरपालिककरिता काही पदांची आवश्यकता नाही.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- मा.शासन निर्णयामध्ये नमुद केल्यानुसारचे ३८ पदापैकी आपले महानगरपालिकाकरिता आवश्यक असे उपसंचालक नगररचना या पदनामाची एक पद संख्या प्रस्तावामध्ये दर्शविलेली आहे. परंतु आपले महानगरपालिका करिता हे पद प्रस्तावीत केलेले नाही. कार्यकारी अभियंता ही दोन पदे प्रस्तावीत केलेली आहेत. त्यापैकी एक बांधकाम विभागाकडेस व एक पाणी पुरवठा विभागाकरिता या प्रमाणे दोन कार्यकारी अभियंता पदांची आवश्यकता आहे. मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी एक पद दर्शविलेले असून आपले महानगरपालिका करिता हे पद प्रस्तावीत केलेले नाही. उपअभियंत्यांची चार पदे प्रस्तावीत केलेला असून त्यापैकी दोन पदास मा. शासनाची मंजूरी प्राप्त आहे.पाणी पुरवठा विभागाकरिता एक उपअभियंता पद आवश्यक आहे. सहाय्यक संचालक नगर रचना एक पद प्रस्तावीत केले असून नगररचना कार यांचे वरिष्ठ म्हणून ते पद आवश्यक आहे. सहाय्यक आयुक्त म्हणूनची तीन पदे प्रस्तावीत केली असून त्यापैकी एका पदास मा.शासनाची मंजूरी प्राप्त आहे. आपले महानगरपालिकेचे चार प्रभाग समिती कार्यालया करिता चार सहाय्यक आयुक्त व प्रशासनात एक सहाय्यक आयुक्त आवश्यक आहे. सहाय्यक आयुक्त , मा.आयुक्त साहेबांचे पी.ए. म्हणून ही काम करू शकतो. स्थानिक पातळी वरील माहिती तो वरिष्ठांना देवु शकतो. पांच सहाय्यक

आयुक्तांची पदे आपले म.न.पास आवश्यक असलेने पांच पदांपैकी मंजूर एक पद वगळता चार सहाय्यक आयुक्ताची पदे प्रस्तावीत करावीत म.न.पा.चे प्रॉपर्टीचे संरक्षण करिता एक सुरक्षा अधिकारी पद आवश्यक आहे. तो म.न.पा.चे प्रॉपर्टीचे संरक्षण, कर्मचारी डयुटया इत्यादी पाहिल तसेच उपमुख्य लेखा परिक्षक म्हणून दोन पदांची आपण मागणी करित आहोत. एक मुख्य लेखा अधिकारी यांचे कडेस व एक मुख्य लेखा परिक्षक यांचेकडेस आवश्यक आहे. याप्रमाणे मा.शासन निर्देशानुसार आपले महानगरपालिके करितांचे पदनिर्मिती प्रस्तावास मा.सभेने मंजूरी देणे विषयी निर्णय घ्यावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- आपले महानगरपालिकाकरितांचे आवश्यक पदांना मंजूरी देणे विषयी मा. महासभे कडेस शिफारस करण्यांत यावी.

मा.श्री.पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्टानुसार आपले म.न.पा. करिता आवश्यक असलेल्या पदांना मंजूरी देणे विषयी शिफारस करण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :-आपले म.न.पा.करिता आवश्यक असलेल्या [१] कार्यकारी अभियंता २ पदे [२] उपअभियंता ३+१ पदे [३] उपअभियंता (पा.पु.) १ पद [४] सहाय्यक संचालक नगररचना १ पद [५] सहाय्यक आयुक्त ३+१ पदे [६] सुरक्षा अधिकारी १ पद [७] उपमुख्य लेखा परिक्षक २ पदे याप्रमाणे पद निर्मिती करणेस सर्वानुमते मान्यता देवुन अखेर मंजूरीसाठी मा. महासभे कडेस शिफारस करण्यांत यावी.

<u>**ठराव :-**</u> मा.शासन निर्णय क्रमांक संर्किण १००५/वर्गीकरण / प्र.क्र.३७९/०५/नवि-२४, मंत्रालय, मुंबई दिनांक ४ मे २००६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे आस्थापना कायम सुचीवरील पद निर्मिती करणेस मंजूरी मिळणेबाबत प्रशासानाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

| अ.नं. | पदांचे नावं | पद संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता | २ | १०६५०-१५५०० |
| २ | उप अभियंता | ३ + १ | ८०००-१३५०० |
| ३ | उप अभियंता (पा.पु.) | १ | ८०००-१३५०० |
| ४ | सहाय्यक संचालक नगररचना | १ | ८०००-१३५०० |
| ५ | सहाय्यक आयुक्त | ३ +१ | ६५००-१०५०० |
| ६ | सुरक्षा अधिकारी | १ | ६५००-१०५०० |
| ७ | उप मुख्य लेखा परिक्षक | २ | ६५००-१०५०० |

वरीलप्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचे आस्थापना कायम सुचीवरील पद निर्मिती करणेस मान्यता देवुन अखेर मंजूरीसाठी मा. महासभे कडेस शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ.

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- ११२ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - ११२ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे केडगांव पाणी पुरवठा योजने करिता ६०० मी.मी. डी.आय.पाईप **ऐवजी** ६१० मी.मी. व्यासाचे मृदू, लोखंडी पाईप बसविणे, रेल्वे क्रॉसिंग करणे ही कामे अतिरिक्त बाबीचे अंतर्गत मंजूर एजन्सी मे.ॲक्वा पंपस् प्रा.लि.यांचे कडून पाईप पुरवठयासह करून घेणेस व त्याकामी येणारे रक्कम रूपये ४४,८०,८२३/-**व** रू. १४,८७,३४२/- चे जादाचे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रेषक-शहर पाणी पुरवठा विभाग/ प्रति- नगरसचिव
पाणी पुरवठा विभाग जा.क्र. १४३० दि.१०/११-०३-२०१०

**प्रस्तावना-विषय-** UIDSSMT योजने अंतर्गत मंजूर झालेली केडगाव पाणी पुरवठा योजनासाठी ६०० मी.मी. डी.आय. पाईप्स ऐवजी ६१० मी.मी. व्यासाचे मृदू लोखंडी पाईप्स बसविणे व रेल्वे क्रॉसींग करणे ही कामे अतिरिक्त बाबींचे अंतर्गत मंजूर एजन्सीकडून करून घेणेबाबत.

**टिप्पणी**

उपरोक्त बाबत विनंती रिपोर्ट की, केडगाव पाणी पुरवठा योजनेअंतर्गत उर्ध्वनलिकेच्या कामासाठी ६०० एम.एम. व्यासाचे डी.आय. के-९ पाईप्स निविदेमध्ये पूर्णपणे अंतर्भूत केलेले होते. परंतु भौगोलिक दृष्टया काही ठिकाणी खडकाळ जमीन व जमिनीचा काही भाग वर खाली असल्या कारणाने डी.आय. पाईप्स टाकणे उचित होणार नाही व त्याकरिता ६१० एम.एम. व्यासाचे व ७.९ एम.एम. जाडीचे मृदू लोखंडी पाईप्स सुमारे ८१५ मी. लांबीचे टाकावे लागणार असल्याचे या प्रकल्पाचे "प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार" महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, अहमदनगर यांनी इकडेस कळवून सविस्तर अंदाजपत्रक सादर केले होते.

केडगांव पाणी पुरवठा योजनेअंतर्गत ६१० एम.एम. व्यासाच्या एम.एम. पाईप टाकणेकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म.जी.प्र. यांनी सादर केलेल्या सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार रू.१,०९,८५,२६२/- इतका खर्च अपेक्षित होता. तसेच सदरच्या ठिकाणी डि.आय. पाईप्स टाकणेकरिता रू.६५,८२,२४२/- इतका खर्च अपेक्षित होता. त्यानुसार रू.३४,७०,४०९/- इतका जादा खर्चचा प्रस्ताव व सदरचे काम हे मे. ॲक्वा पंपस् प्रा.लि. यांचेकडून करून घेणे कामीसाठीचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता.

परंतु "प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार" म.जी.प्रा.यांनी सन२००९-१०चे दरसुचीनुसार पुन्हा दि.२०/१/२०१०रोजी अंदाजपत्रक पाठवून सदरच्या कामास रू.१,१८,७९,१२७/-इतका खर्च अपेक्षित असल्याचे कळविले आहे.त्यानुसार सदर कामासाठी एकूण अंदाजपत्रकीय रकमेमधून डी.आय. पाईप्स टाकणेचा खर्च वगळता रू.४४,८०,८२३/- इतका जादाचा खर्च येणार आहे. करिता फेर सविस्तर प्रस्ताव तयार करण्यात आला.

तसेच नविन दरसुचीनुसार रेल्वे क्रॉसींगकरिता रेल्वे खात्याने प्रमाणित केलेल्या अंदाजपत्रकानुसार रू.१४,८७,३४२/- इतका खर्च अपेक्षित आहे.

करिता ६१० एम.एम. व्यासाच्या एम.एस. पाईप टाकणेच्या कामास सन २००८-२००९ चे दरसूचीनुसार रू.३४,७०,४०९/-च्या खर्चा ऐवजी सन२००९-२०१० प्रमाणे येणा-या रू.४४,८०,८२३/-च्या जादाच्या खर्चास व रेल्वे लाईन ओलांडून ११०० एम.एम. व्यासाचा मृदू लोखंडी पाईप व ६०० एम.एम.व्यासाचे डी.आय.पाईप्स टाकणेच्या कामास सन२००८-२००९दरसूची नुसार रू. १५,२८,९५७/- च्या खर्चा ऐवजी सन२००९-२०१० प्रमाणे येणा-या रू. १४,८७,३४२/- च्या खर्चास व सदरचे दोन्ही कामे मे.ॲक्वा पंपस् प्रा.लि. यांचेकडून करून घेणे सोयीस्कर होईल असा प्रकल्प खर्चास व सदरची दोन्ही कामे मे. ॲक्वा पंपस् प्रा.लि. यांचेकडून करून घेणे सोईस्कर होईल असा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म.जी.प्रा. यांनी अभिप्राय दिला आहे. स्विकृत निविदेच्या सर्वसाधाण अट क्र. GC १९ अन्वये प्रस्तावीत काम चालू नविन दरसूची नुसार पुर्ण करणे मे. ॲक्वा पंपस्, प्रा.लि. यांचेवर बंधनकारक आहे.

तसेच नागापूर पंपहाउस ते केडगांव ही जलवाहिनी टाकतांना एका ठिकाणी रेल्वे क्रॉसींग करावी लागणार आहे. याकामी रेल्वे प्रशासनाची परवानगी मिळणे बाबत प्रशासकीय कार्यवाही चालू असून, परवानगी अंतिम टप्यात आलेली आहे.

रेल्वे क्रॉसींगच्या ठिकाणी ६०० मी.मी., डी.आय. पाईप्सला आवरण म्हणून ११०० एम.एम. मृदू लोखंडी पाईप्स टाकावे लागणार आहे. हे पाईप्सही मे. ॲक्वा पपंस्, प्रा.लि. यांचेकडून पुरवठा करून घेता येतील तसेच रेल्वे क्रॉसींगच्या ठिकाणचे कामही त्यांना देता येईल. याबाबत एकूण खर्च रू.१४,८७,३४२/- अपेक्षित आहे.

याबाबत सविस्तर फेर प्रस्ताव सादर केला असता मा.मुख्यलेखाधिकारी, मा.मुख्यलेखापरिक्षक, मा.उपायुक्त, मा.आयुक्त महोदयांनी सदर बाबत मा.स्थायी समितीची मंजूरी द्यावी असे निर्देशित केलेले आहे. करिता

१) भौगोलिक परिस्थितीमुळे ६०० मी.मी. डी.आय. पाईप्स ऐवजी मृदू लोखंडी पाईप्स टाकणेस, सदर पाईप्स मे. ॲक्वा पंपस्, प्रा.लि. यांचेकडून (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, अहमदनगर यांचे अभिप्रायानुसार) सन२००९-२०१० दरसुचीनुसार पुरवठा करून व सलग्न कामे करून घेणेस म.जी.प्रा.यांनी दि.२/२/२०१०रोजीचे पत्र क्र.ताशा१/३३९अन्वये त्याबाबतचे अंदाजपत्रकही प्राप्त झालेले त्यानुसार याकामी येणारे खर्च रक्कम **रू.४४,८०,८२३/-(**६०० एम.एम. डी.आय. पाईप्स ऐवजी ६१० एम.एम. मृदू लोखंडी पाईप्स टाकणे या कामाकरिता म.जी.प्रा. कडून प्राप्त झालेले सन २००९-२०१०चे एकूण खर्च रू.१,१८,७९,१२७/- वजा ६००एम.एम., डी.आय. पाईप्स न वापरल्यामुळे होणारी बचत रू.६५,८२,२४२/-**)** च्या खर्चास मंजूरीस्तव तसेच
२) रेल्वे क्रॉसींगचे काम मे. ॲक्वा पंपस् प्रा.लि.यांचेकडून ११०० मी.मी. पाईप्सच्या पुरवठयासह करून घेणेस व याकामी येणारे खर्च रू. १४,८७,३४२/- च्या मंजूरीस्तव मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे केडगांव पाणी पुरवठा योजने करिता ६०० मी.मी. डी.आय.पाईप **ऐवजी** ६१० मी.मी. व्यासाचे मृदू, लोखंडी पाईप बसविणे, रेल्वे क्रॉसिंग करणे ही कामे अतिरिक्त बाबीचे अंतर्गत मंजूर एजन्सी मे.ॲक्वा पंपस् प्रा.लि.यांचे कडून पाईप पुरवठयासह करून घेणेस व त्याकामी येणारे रक्कम रूपये ४४,८०,८२३/-**व** रू. १४,८७,३४२/- चे जादाचे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- केडगांव पाणी पुरवठा योजने करिता ६०० मी. मी., डी.आय. पाईप्स ऐवजी ६१० मी मी व्यासाचे मृदु लोखंडी पाईप्स बसविणे रेल्वे क्रॉसींग करणे ही अतिरिक्त कामे मंजूर एजन्सी मे.ॲक्वा पंपस् प्रा.लि. यांचेकडून पाईप पुरवठयासह करून घेणेस व त्या कामीचे येणारे जादाचे खर्चास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे शि.बा. :- रेल्वे क्रॉसींग करिताचे खर्च तरतुदीस रेल्वे प्रशासनाची मान्यता मिळाली का?

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- रेल्वे क्रॉसींगचे कामाकरिता तरतुद धरणेत आलेली आहे. त्यास रेल्वे प्रशासनाची परवानगी मिळणेबाबत कार्यवाही अंतिम टप्यात आलेली आहे. केडगांव पाणी पुरवठा योजने अंतर्गत उर्ध्वनलिकेच्या कामासाठी ६०० मी.मी. व्यासाचे डि.आय. के-९ पाईप्स निविदेमध्ये अंतर्गत केलेले होते. १३ कि.मी. पाईप टाकणे होते. परंतु काही ठिकाणी खडक आल्याने मृदु लोंखडी पाईप्स टाकावे लागणारे आहेत. जमिनी वर पाईप्स टाकणे असल्याने डि.आय. पाईप टाकणे उचित होणार नसलेने ६१० मी.मी. व्यासाचे ७.९ मी.मी. जाडीचे मृदू लोखंडी पाईप टाकावे लागणार आहेत. रेल्वे क्रॉसींग करिता रूपये १४,८७,३४२/- इतका खर्च रेल्वे खात्याने प्रमाणित केलेला असून मे. ॲक्वा पंपस् प्रा.लि. यांचेकडून पाईप पुरवठयासह संलग्न कामे करून घेण्यांस व त्याकामी येणारे रक्कम रूपये ४४,८०,८२३/-+१४,८७,३४२/- चे जादाचे खर्चास मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- प्रस्ताव क्रमांक ११२ व ११३ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर करावे. जादाचे खर्चास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. कांबळे र.द. :- प्रस्ताव क्रमांक ११२ व ११३ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत यावे.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव क्रमांक ११२ व ११३ चे ऑफिस रिपोर्टास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे केडगांव पाणी पुरवठा योजने करिता प्रस्तावात नमूद केलेल्या ठिकाणी ६०० मी.मी.डी.आय.पाईप **ऐवजी** ६१०मी.मी.व्यासाचे मृदू,लोखंडी पाईप बसविणे, रेल्वे क्रॉसिंग करणे ही कामे अतिरिक्त बाबीचे अंतर्गत मंजूर एजन्सी मे.ॲक्वा पंपस् प्रा.लि.यांचे कडून पाईप पुरवठयासह करून घेणेस व त्याकामी येणारे रक्कम रूपये ४४,८०,८२३/-(रूपये चव्वेचाळीस लाख ऐंशी हजार आठशे तेवीस फक्त) **व** रू.१४,८७,३४२/-(रूपये चौदा लाख सत्याऐंशी हजार तीनशे बेचाळीस फक्त)चे जादाचे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

अनुमोदक :- मा.श्री. कांबळे रवी दगडू.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- ११३ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - ११३ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे केडगांव पाणी पुरवठा योजने अंतर्गत पंपींग मशिनरीसाठी ट्रान्सफार्मर, ग्रॅन्ट्री व सलग्न कामे अतिरिक्त बाबीच्या दरसुची नुसार मे.ॲक्वा पंपस्, प्रा.लि.यांचेकडून करून घेण्यांस व त्यामुळे होणा-या जादाचे रक्कम रूपये १,७१,३१६/-चे खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- विषय- केडगाव पाणी पुरवठा योजना

केडगाव योजनेअंतर्गत पंपीग मशिनरीसाठी लोड वाढवून घेणे बाबत.

संदर्भ :- १) म.जी.प्रा. जा.क्र./ तांत्रिक शाखा यांत्रिकी / २३६५ /२००९ दि. १८/९/०९ रोजीचे पत्र

२) म.जी. प्रा. जा.क्र./ तांत्रिक शाखा यांत्रिकी/ २४८० दि.२९/९/०९

३) म.जी.प्रा. जा.क्र./ तांत्रिक शाखा यांत्रिकी/ २४८२ दि. ३०/९/०९

मा. सादर,

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट की, UIDSSMT योजनेअंतर्गत केडगाव प्रभागासाठी पाणी पुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. व सदरची पाईप लाईन ही अहमदनगर पाणी पुरवठा योजनेतील अस्तित्वातील नागापूर पंपीग स्टेशन पासून टाकण्यात येत आहे. त्यासाठी अस्तित्वातील पंपीग हाउस मध्येच १०० एच.पी.चे ३ पंप बसविण्याचे प्रस्तावीत केले आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (कन्सलटंट) यांचेकडून संदर्भिय प्राप्त पत्रानुसार विषयांकित पाणी पुरवठा योजनेसाठी २०० के.व्ही.ए. ट्रान्सफार्मर व सबस्टेशन प्रस्तावीत असून त्यासाठी एकाच ठिकाणी दुसरे विद्युत कनेक्शन घेता येणार नाही असे कळवून अस्तित्वातील कनेक्शनवर लोड वाढवून घेण्यात येणे विषयीचा निर्णय महानगरपालिकेकडून म.जी.प्रा. स कळविण्यात यावा असे नमूद केलेले आहे.

सद्यस्थितीत नागापूर पंपीग स्टेशन येथे ५०० के.व्ही.ए. चा ट्रान्सफार्मर असून त्याद्वारे ३०० एच.पी.चा. पंप सध्या कार्यरत आहे. तसेच केडगाव पाणी पुरवठा योजनेसाठी तेथे स्वंतत्र १०० एच.पी.पंप बसविणेचे प्रस्तावीत आहेत. परंतु अस्तित्वातील ५०० के.व्ही.ए.चा ट्रान्सफार्मर वरून नव्याने कार्यान्वित करण्यात येणा-या पंपास जुन्यासह आवश्यक तो जादा वाढीव वीजभार विद्युत मंडळाकडून वाढून घेणे आवश्यक आहे.

तरी म.जी.प्रा. कन्सलटंट यांनी संदर्भिय पत्रात नमूद केल्याप्रमाणे अस्तित्वातील आहे. त्याच

१) ट्रान्सफॉर्मर व सबस्टेशन मध्ये वीज लोड वाढवून घेणेसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला पत्र देणे बाबत व

२) नवीन सबस्टेशनला परवानगी मिळत नसल्याने प्रस्तावीत २००के.व्ही.ए.ट्रान्सफार्मर ऐवजी, लोड वाढवून सध्याच्या ५०० के.व्ही.ए. ट्रान्सफॉर्मरला, एक नविन ७५० के.व्ही.ए.ट्रान्सफॉर्मर बसविणेस व सदर काम अतिरिक्त बाबींच्या अंतर्गत मे.ॲक्वा पंपस् यांचे मार्फत करून घेणे बाबत.

पुढील आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे. दि. १२/१०/०९

मुख्य लेखा परिक्षक :- अ.क्र. २ चे कामासाठी किती खर्च अपेक्षित आहे. हे नमूद करावे अ.क्र. २ बाबीचे सुधारित अंदाजपत्रकात समावेश आहे किंवा कसे याबाबत टिपणीमध्ये स्पष्टीकरणकरणे आवश्यक आहे. दि. १४/१०/०९

फेर सादर,

अ.क्र. २ चे कामासाठी अंदाजे खर्च रू. १०.३० लक्ष इतका अपेक्षित असून यात ट्रान्सफॉर्मर सह पंप हाउसमधील गॅन्ट्रीचा समावेश आहे. सदर बाब मूळ अंदाजपत्रकात समाविष्ट नसून "अतिरिक्त बाब" म्हणून एजन्सीकडून करण्याचे प्रस्तावीत आहे.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे. दि. २२/१०/०९

मुख्य लेखा परिक्षक :- टिपणीमध्ये अ.क्र. १ व २ मध्ये सुचीत केले प्रमाणे कार्यवाही करणेत यावी. मात्र मूळ अंदाजपत्रकापेक्षा एकूण जादा खर्च झाल्यास सुधारित अंदाजपत्रक करणेत यावे. दि.२९/१०/०९

मुख्य लेखा अधिकारी :- रू. १०.३० लाख जादा खर्च होणार असल्याने मा.स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. दि.३०/१०/०९ **/अ**

मा.उपायुक्त (सा) साहेब :- **"अ"** प्रस्तावीत नुसार मान्य करणेस हरकत नाही. दि.०६/११/०९

मा.आयुक्त साहेब :- पाणी पुरवठा तातडीची बाब म्हणून विषय निकटवर्ती स्थायी समितीत घ्यावा. दि.९/११/०९

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे केडगांव पाणी पुरवठा योजने अंतर्गत पंपींग मशिनरीसाठी ट्रान्सफार्मर, ग्रॅन्ट्री व सलग्न कामे अतिरिक्त बाबीच्या दरसुची नुसार मे.अॅक्वा पंपस्, प्रा.लि.यांचेकडून करून घेण्यांस व त्यामुळे होणा-या जादाचे रक्कम रूपये १,७१,३१६/- (रूपये एक लाख एक्काहत्तर हजार तीनशे सोळा फक्त )चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.
सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

नुमोदक :- मा.श्री. कांबळे रवी दगडू
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- ११४ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - ११४ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे रोज होणा-या मेजर व मायनर ऑपरेशन करिता इच्छुक वैद्यकिय अधिकारी बधिरीकरण तज्ञांची तात्पुरत्या स्वरूपात प्रत्येक मेजर ऑपरेशन करिता रूपये ४००/- व प्रत्येक मायनर ऑपरेशन करिता रूपये २००/- याप्रमाणेचे मानधनावर दि.५/०१/२०१० ते दि. ४/०७/२०१० अखेर सहा महिन्यांसाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- आस्थापना जा.क्र. १०० दिनांक २२/१/२०१०

विषय :- भुल तज्ञांची पॅनलशिपवर नेमणूक करणे बाबत.

सादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, मा. मुख्य वैद्यकिय अधिकारी, यांनी रिपोर्ट देवुन कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह येथे रोज होणा-या मेजर व मायनर ऑपरेशन करीता वैद्यकिय अधिकारी बधिरिकरण तज्ञांची आवश्यकता असते. भुल तज्ञांचे पद आस्थापना सुचिवर नाही. त्या करीता मा.स्थायी समिती ठराव नं. ४४ दि.२५/८/०९ अन्वये दि.४/७/०९ ते ३/१/२०१० अखेर प्रत्येकी मेजर ऑपरेशन करीता रू.४००/- व प्रत्येकी मायनर ऑपरेशन करीता रू.२००/- प्रमाणे इच्छुक वैद्यकिय अधिकारी बधिरिकरण तज्ञांची पॅनलशिपवर मानधनावर नेमणूक करण्यात आलेली असुन सदरची मुदत दि.३/१/२०१० रोजी संपत आहे.

कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृहामध्ये प्रामुख्यांने गरीब व मध्यम वर्गातील रूग्ण औषधोपचार व प्रसुति करीता येतात. त्यामुळे भुलतज्ञा अभावी ऑपरेशन करीता खाजगीरित्या भुलतज्ञांना कॉल केल्यास त्यांची भुल दिल्याबद्दलची फी रूग्णाना परवडणारी नसते. त्यामुळे रूग्णांची व पर्यायी हॉस्पीटलची गैरसोय होईल. तसेच हॉस्पीटलच्या दृष्टीने इर्मजन्सीच्या वेळी रूग्ण भुलतज्ञा अभावी दाखल करून घेणे धोक्याचे होईल व त्यामुळे हॉस्पीटल मध्ये दाखल होणा-या रूग्णांच्या संख्येवर परिणाम होण्याची दाट शक्यता लक्षात घेता हॉस्पीटल व रूग्णांच्या दृष्टीने भुलतज्ञांची पॅनलशिपवर नेमणुक करणे गरजेचे आहे.

तसेच दवाखान्यात दर महा साधाणत: ५० ते ६० मेजर ऑपेरशन व ३० ते ४० मायनर ऑपरेशन करीता भुलतज्ञांची आवश्यकता असते. सद्या भुल दिल्या बद्दल महानगरपालिका दि.१/४/२००० पासून १) जनरल ॲनस्थेशिया (ऑपरेशन टयुबेकटोमी व्यतरीक्त) रू.१००/- २) लोकल ॲनस्थेशिया रू.३०/- प्रत्येक ऑपरेशन करीता फि म्हणुन वसुल केली जाते.

तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये दिनांक ५/१/२०१० ते ४/७/२०१० अखेर सहा महिन्या करीता पॅनलशिपवर प्रत्येक मेजर ऑपरेशन करीता ४००/- व मायनर ऑपरेशन करीता रू.२००/- प्रमाणे शहरातील इच्छुक भुल तज्ञांची नेमणूक करणे बाबत विनंती केलेली होती.

मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ मध्ये कलम ५३ (१) अन्वये कारवाई करणे बाबत नमुद केले असून सहा महिन्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूकी बाबत कलम ५३(१) मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

५३:- नेमणुकीचे अधिकार कोणामध्ये निहित असणे.

१.महानगरपालिकेच्या ज्या अधिका-यांचे किमान वेतन भत्ते वगळून चारशे रूपये किंवा त्याहून अधिक आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल.

परंतु आयुक्ताला भत्ते वगळुन चारशे किंवा त्याहून अधिक मासिक वेतन असलेल्या कर्ज विषयक कामासाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणूका सहा महिन्याहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समिती पुर्व मंजूरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणूक करताना त्या विषयक महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणी उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पूर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणूकीचे नवीकरण करता येणार नाही.

२.पोट कलम (१) मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रण खालील नगर पालिका अधिकारी व कर्मचारी मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत यांची नेमणूक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधिन यथास्थिती,नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहित असेल मात्र कोणत्याही विशिष्ठ प्रकरणात किंवा प्रकरणाच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही. असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

३.या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतिरिकत नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित असेल.

परंतु कायम नेमणूकाच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजूर केलेल्या त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधिन असेल.

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पूर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधी साठी करता येणार नाही. आणि भत्ते वगळुन शंभर रूपयाहून अधिक मासिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही. असे नमुद केलेले आहे.

तरी बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथील येणा-या रूग्णांची निकड लक्षात घेता व मा. मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांचे प्रस्तावाप्रमाणे सोबत जोडलेल्या मागील आदेशातील इच्छुक भुल तज्ञांची तात्पुरत्या स्वरूपात प्रत्येक मेजर ऑपरेशन साठी रू.४००/- व प्रत्येक मायनर ऑपरेशन रू.२००/- मानधनावर दि.५/१/२०१० ते ४/७/२०१० अखेर सहा महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात नेमणूका होण्याबाबत आदेशार्थ सादर. **/अ**

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे. दि.७/१/२०१०

सामान्य प्रशासन विभाग (विभाग प्रमुख) :- **"अ"** प्रमाणे मान्यतेस्तव सादर. दि. १३/०१/१०

मा.उपायुक्त (कर) साहेब :- **"अ"** नुसार प्रस्तावीत बाबत मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर करणेच्या मान्यतेस्तव सादर. दि.१८/०१/१० /अ

मा.आयुक्त साहेब :- मा.स्थायी समिती कडे मंजुरीसाठी पाठवा. दि.२०/०१/१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे रोज होणा-या मेजर व मायनर ऑपरेशन करिता इच्छुक वैद्यकिय अधिकारी बधिरीकरण तज्ञांची तात्पुरत्या स्वरूपात प्रत्येक मेजर ऑपरेशन करिता रूपये ४००/- व प्रत्येक मायनर ऑपरेशन करिता रूपये २००/- याप्रमाणेचे मानधनावर दि.५/०१/२०१० ते दि. ४/०७/२०१० अखेर सहा महिन्यांसाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

--००--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे मानधनावर भुलतज्ञांची नेमणूक करणे करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे.:- महानगरपालिका मार्फत आर.सी.एच. आरोग्य केंद्र बंद करणार आहेत त्याबाबत माहिती सांगावी.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- मा.आयुक्त साहेब यांचे मंजूरीने सहा महिन्याकरिता आर.सी.एच. आरोग्य केंद्र सुरू रहाणार असून मा.आयुक्त साहेब यांचे मंजूरीने त्या नंतरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे मंजूरीसाठी सादर करणेत येईल.

मा.श्री. पवार बा.रे. :- भुलतज्ञ नेमणेस तसेच बालरोग तज्ञांची मानधनावर नेमणूक करणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा. श्री. बारस्कर पो.ज. :- प्रस्ताव क्रमांक ११४ व ११५ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव क्रमांक ११४ व ११५ चे ऑफिस रिपोर्टास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे रोज होणा-या मेजर व मायनर ऑपरेशन करिता इच्छुक वैद्यकिय अधिकारी बधिरीकरण तज्ञांची तात्पुरत्या स्वरूपात प्रत्येक मेजर ऑपरेशन करिता रूपये ४००/-(रूपये चारशे फक्त) व प्रत्येक मायनर ऑपरेशन करिता रूपये २००/-(रूपये दोनशे फक्त ) याप्रमाणेचे मानधनावर दि.५/०१/२०१० ते दि. ४/०७/२०१० अखेर सहा महिन्यांसाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- ११५ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - ११५ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे बालरोग तज्ञ डॉ.श्री. सुभाष फिरोदिया, डॉ.श्री. अनिरूध्द गिते, व डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची दरमहा रूपये १५००/- चे मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात दिनांक २५/१२/२००९ ते २४/०६/२०१० अखेर सहा महिन्यांकरिता नेमणूक करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- आस्थापना जा.क्र. १०१ दिनांक २२/१/२०१०

विषय :- बालरोग तज्ञांची मानधनावर नेमणूक करणे बाबत.

सादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, मा. मुख्य वैद्यकिय अधिकारी, यांनी रिपोर्ट देवुन कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञ डॉक्टरांची आवश्यकता नेहमी भासते. आस्थापना सुचिवर बालरोग तज्ञांचे पद मंजूर नसल्यामुळे बालरोग तज्ञ डॉक्टरांची (ऑनररी बालरोग तज्ञ म्हणुन) मानधनावर नेमणूक करावी लागते. कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे मानद बालरोग तज्ञ डॉ. श्री. सुभाष फिरोदिया, डॉ.श्री. अनिरूध्द गिते, डॉ.श्री.सुचित तांबोळी, यांची दरमहा रू. १५००/- मानधनावर दि.२४/६/०९ ते २३/१२/०९ अखेर सहा महिन्याकरीता नेमणूक केलेली होती. सदरच्या नेमूणकी ची मुदत दि.२४/१२/०९ रोजी संपत आहे.

सदर बालरोग तज्ञांची मुदत संपत असल्याने त्यांनी अर्ज देवून त्यांचे सेवा पुढील काळात चालू ठेवण्यासाठी विनंती अर्ज दिलेले आहे.

वरील बालरोग तज्ञ बा.दे. दवाखान्यातील नवजात अर्भकांची तपासणी करून औषधोपचार करतात त्यामुळे दवाखान्यात येणा-या गरीब व गरजु रूग्णांना जास्तीत जास्त फायदा होतो.

तसेच मागील बालरोग तज्ञ यांच्या तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देण्याबाबत च्या मंजूर प्रस्तावात सन २००९-२०१० मधील एप्रिल २००९ ते जुलै २००९ अखेरच्या विशेष अर्थ संकल्पात स्थायी आस्थापना ऑनररी डॉक्टर्स या लेखाशिर्षा खाली रू.१,३३,०००/- तरतुद केल्याबाबत नमुद केलेले होते. या प्रस्तावात डॉ.श्री. सुभाष फिरोदिया , डॉ.श्री. अनिरूध्द गिते, डॉ.श्री. सुचित तांबोळी, बालरोग तज्ञांची मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये दिनांक २५/१२/०९ ते दि.२४/६/०९अखेर सहा महिन्याकरीता दरमहा रू.१५००/- मानधनावर नेमणूक होण्याबाबत विनंती केली आहे.

तरी मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ मध्ये कलम ५३ (१) अन्वये कारवाई करणे बाबत नमुद केले असून सहा महिन्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूकी बाबत कलम ५३(१) मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

५३:- नेमणुकीचे अधिकार कोणामध्ये निहित असणे.

१.महानगरपालिकेच्या ज्या अधिका-यांचे किमान वेतन भत्ते वगळून चारशे रूपये किंवा त्याहून अधिक आहे.मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल.

परंतु आयुक्ताला भत्ते वगळुन चारशे किंवा त्याहून अधिक मासिक वेतन असलेल्या कर्ज विषयक कामासाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणूका सहा महिन्याहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समिती पुर्व मंजूरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणूक करताना त्या विषयक महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणी उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पूर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणूकीचे नवीकरण करता येणार नाही.

२.पोट कलम (१) मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणा खालील नगर पालिका अधिकारी व कर्मचारी मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत यांची नेमणूक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधिन यथास्थिती,नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहित असेल मात्र कोणत्याही विशिष्ठ प्रकरणात किंवा प्रकरणाच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही. असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

३.या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतिरिकत नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित असेल.

परंतु कायम नेमणूकाच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजूर केलेल्या त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधिन असेल.

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पूर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधी साठी करता येणार नाही. आणि भत्ते वगळुन शंभर रूपयाहून अधिक मासिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही. असे नमुद केलेले आहे.

या पूर्वी तात्पुरत्या स्वरूपात नेमणुकी बाबत मागील कालावधीस मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला असुन अद्यापपर्यंत मागील कालावधीच्या नेमणूकीस मा.स्थायी समितीची मंजुरी मिळालेली नाही.

तरी बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथील येणा-या रूग्णांची निकड लक्षात घेता व मा. मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांचे प्रस्तावाप्रमाणे डॉ.श्री.सुभाष फिरोदिया,डॉ.श्री.अनिरूध्द गिते,डॉ.श्री. सुचित तांबोळी, बालरोग तज्ञ यांची रू.१५००/- मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात दि.२५/१२/०९ ते २४/६/२०१० सहा महिन्याकरीता नेमणूक होण्याबाबत आदेशार्थ सादर./**अ**

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे. दि.७/१/२०१०

सामान्य प्रशासन विभाग (विभाग प्रमुख) :- **"अ"** प्रमाणे मान्यता देणे योग्य मान्यतेस्तव सादर. दि. १३/०१/१०

मा.उपायुक्त साहेब (कर):-(१) प्रस्तावीत मान्यतेस्तव मा.स्थायी समिती समोर सादर करणेच्या मान्यतेस्तव सादर. (२) प्रस्ताव विलंबाने दाखल केलेबाबत आस्थापना विभागातील संबंधीतास कारणे दाखवा नोटिस बजावणी करून खुलासा मागविणे उचित. दि.१९/०१/२०१० /**अ**

मा.आयुक्त साहेब :- मा.स्थायी समिती कडे मंजुरीसाठी पाठवा. दि.२१/०१/१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे बालरोग तज्ञ डॉ.श्री. सुभाष फिरोदिया, डॉ.श्री. अनिरूध्द गिते, व डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची दरमहा रूपये १५००/- चे मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात दिनांक २५/१२/२००९ ते २४/०६/२०१० अखेर सहा महिन्यांकरिता नेमणूक करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

--**--

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे बालरोग तज्ञ डॉ.श्री. सुभाष फिरोदिया, डॉ.श्री. अनिरूध्द गिते, व डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची दरमहा रूपये १५००/-(रूपये एक हजार पाचशे फक्त)चे मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात दिनांक २५/१२/२००९ ते २४/०६/२०१० अखेर सहा महिन्यांकरिता नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- ११६ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - ११६ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील विघंन विहिरी दुरूस्ती कामी सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिता मागविण्यांत आलेल्या निविदा दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- शहर पाणी पुरवठा विभाग दि.३०/६/०९

विषय- अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील विंधन विहीरी दुरूस्ती कामी प्राप्त कमीचे दर निविदाधारक यांना वाटाघाटीसाठी बोलावणेस मंजूरी मिळणे बाबत.

मा.सादर,

उपरोक्त विषयान्वये सादर की, महानगरपालिकेच्या हद्दीतील विंधन विहीरी दुरूस्ती कामी दुस-यांदा फेरनिविदा वर्तमानपत्रात प्रसिध्द करून दि.१७/६/०९ रोजी सिलंबद निविदा स्विकारून वेळेत व मुदतीत खालील प्रमाणे प्राप्त दोन निविदा समक्ष उघडणे बाबत मंजूरीस्तव प्रस्ताव ठेवण्यात आला.

१) संजय रघुनाथ चितळकर-सु.बे.अभियंता अहमदनगर
२) स्वप्निल नंदकुमार गांधी-सु.बे.अभियंता अहमदनगर

वरीलप्रमाणे वेळेत व मुदतीत प्राप्त निविदा दि. २९/६/०९ रोजी मा.उपायुक्त यांचे आदेशान्वये मा.मुख्यलेखाधिकारी यांचे दालनात निविदा धारक प्रतिनिधी यांचे समक्ष उघडले असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

**विंधन विहीरी दुरूस्ती कामी सन २००९-२०१० निविदा दराचा तुलनात्मक तक्ता**

| अ.नं. | विषय | निविदा दर | | मागील तीन वर्षाचे मंजूर दर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संजय चितळकर | स्वप्निल गांधी | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ |
| १ | अहमदनगर म.न.पा.च्या हद्दीतील विंधन विहीरी दुरूस्त करणे सन २००९-२०१० साला करिता प्रति विंधन विहीर दर ठरविणे | रू.७२०/- प्रति विंधन विहीर | रू.७५०/- प्रति विंधन विहीर | रू. ५७०/- प्रति विंधन विहीर | रू. ३९०/- प्रति विंधन विहीर | रू. ३९०/- प्रति विंधन विहीर |

वरील विंधन विहीरी दुरूस्ती कामीचा दराचा तुलनात्मक तक्ता पाहता श्री. संजय रघुनाथ चितळकर दहिगाव साकत ता. जि. अहमदनगर यांचे दर कमीचे प्राप्त झाले असून मागील तीन वर्षाचे मंजूर दर पाहता आलेले दर सन २००६-० च्या २६.३१% व सन २००८-०९ व २००९-१० च्या ८४.६१ % जादाचे आल्याने ते अवाजवी वाटतात. तरी श्री. संजय रघुनाथ चितळकर यांना दराचे वाटाघाटीसाठी बोलावणे योग्य वाटते.

तथापी आपले पुढील आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख :- तुलनात्मक दृष्टया आलेले कमीचे दर हे सुद्धा अवाजवी असल्याने, कमीच्या निविदाधारकाशी दर कमी करणेच्या दृष्टीकोनातून वाटाघाटी करणे योग्य वाटते मंजुरीस्तव सादर. दि.१/७/०९ **/अ**

मुख्य लेखा परिक्षक :- वरील **"अ"** प्रमाणे ठेकेदारास दर वाटाघाटीबाबत बोलविणेत यावे. दि.१/७/०९

मुख्य लेखा अधिकारी :- वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेबाबत कळविणे योग्य. दि.१/०७/०९/अ

मा.उपायुक्त साहेब (सा.) :- प्रस्तावीत मान्य दि. ०४/०७/०९

अहमदनगर महानगरपालिका,
पाणी पुरवठा विभाग

विषय :- अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील विंधन विहीरी दुरूस्त करणे कामी प्राप्त कमीचे दर निविदा धारक संजय रघुनाथ चितळकर यांचे वाटाघाटीचे दरास सक्षम समितीची मंजूरी मिळणे बाबत.

मा.सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर की, अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील विंधन विहीरी दुरूस्ती कामी जाहिर निविदा प्रसिध्द करून प्राप्त निविदांमधून कमीचे दर निविदाधारक यांना पाणी पुरवठा जा.क्र. ४४५ दि.१५/७/०९ अन्वये वाटाघाटीसाठी बोलाविले असता त्यांचे कडील सा.प्र.वि. आ.क्र. ६४२२ दि.६/११/०९ चे पत्रानुसार त्यांनी मा. उपायुक्त साहेब यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार निविदेत भरलेले दर रू.७२०/- प्रति विंधन विहीर ऐवजी रू.७००/- प्रति विंधन विहीर या दराने काम करणेचे इकडेस कळविले आहे. तरी त्यांचे कडील प्राप्त वाटाघाटीच्या दरानुसार काम करून घेणेस व खर्चास मंजूरी मिळणेस्तव तसेच त्यांच्याकडून नियमानुसार करारनामा करून घेवून त्यांना कामाचे कार्यादेश देणेस मंजूरी मिळणेस्तव पुढील योग्य त्या आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

मा. उपअभियंता :- मागील २ वर्षाचे दर पाहता प्रथम वाटाघाटीनंतरचे दर जवळजवळ दुप्पट आहेत. याबाबतीत उपअभियंता भू.स.वि.यं. जि. प. अहमदनगर यांचा अभिप्राय घेणे उचित वाटते. तथापी आदेशार्थ सादर. दि.२४/११/०९ **/अ**

मा. शहर अभियंता :- **"अ"** प्रमाणे मान्यतेस सादर. दि.३/१२/०९

मुख्य लेखा परिक्षक :- प्रस्तावीत **"अ"** नुसार कार्यवाही करावी. दि.९/१२/०९

मुख्य लेखा अधिकारी :- विंधन विहीरी दुरूस्तीचे दर मंजूरीस्तव मा.स्थायी समिती समोर सादर करणे योग्य. दि.११/१२/०९ **/अ**

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- **"अ"** प्रस्तावीत मान्य करणेस हरकत नाही. दि.२३/१२/०९

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. २४/१२/०९

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- विंधन विहीरी दुरूस्ती कामी सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिता मागविण्यांत आलेल्या निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- मा. सभेस प्रस्तावाची माहिती देण्यांत यावी.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील विंधन विहिरी दुरूस्त करणे कामी दुरू-यांदा फेर निविदा मागविल्या असता दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या. कमीचे निविदा धारक यांचा निविदा दर प्रती विंधन विहिर रूपये ७२०/- प्राप्त झाला आहे त्यांना वाटाघाटीसाठी बोलावले असता त्यांनी फक्त रूपये २०/- कमी करून प्रति विंधन विहीर रूपये ७००/- असा दर वाटाघाटी अंती दिलेला आहे. हा दर खुपच जास्त आहे. श्री. संजय चितळकर यांचे रूपये ३९०/- प्रति विंधन विहीर हे सन २००८-०९ चे दर मंजूर आहेत. त्या पेक्षा हे दर ८४.६१% ने जास्तीचे आहेत.

मा.श्री. पवार बा.रे. :- आपले महानगरपालिका हद्दीत किती विंधन विहीरी आहेत.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- एकूण १२०० ते १३०० विंधन विहीरी आहेत.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- या सर्व विंधन विहीरीचा वापर होतो का?

मा.सभापती साहेब :- मागील वर्षीपेक्षा दहा टक्के जादा दर मंजूर करणेस हरकत नाही.विंधन विहीरी दुरूस्तीचा वार्षिक खर्च किती होतो.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- वार्षिक रूपये सहा ते सात लाख खर्च होतो.

मा.श्री. पवार बा.रे.:- सन २००८-२००९ चे मंजूर दरामध्ये दहा टक्के वाढ देवुन येणारे दरास मंजूरी देणेत यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- विंधन विहीरी दुरूस्ती कामी मागील वर्षाचे मंजूर दर रूपये ३९०अधिक १०% प्रमाणे येणार रूपये ४२९/- प्रमाणे प्रति विंधन विहिर दुरूस्ती दर मंजूर करणेत यावेत.

मा.श्री. सभापती साहेब :- सर्वानुमते मागिल वर्षाचे सन २००८-२००९ चे विंधन विहीरीचे दुरूस्ती करिता मंजूर असलेल्या रूपये ३९०/- या दरामध्ये दहा टक्के वाढ करून प्रति विंधन विहीर रूपये ४२९/- हा दर मंजूर करण्यांत यावा. संबंधीत एजन्सी या दराने काम करण्यांस तयार नसल्यास या कामासाठी फेर निविदा मागविण्यांत याव्यात.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील विधंन विहिरी दुरूस्ती कामी सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिता मागविण्यांत आलेल्या निविदा दरास मंजूरी मिळणे विषयी प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहेत.

स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदादर धारक श्री. संजय रघुनाथ चितळकर यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेले प्रती विंधन दर हे मागील वर्षीचे मंजूर दरापेक्षा खुपच जास्तीचे असल्याने सन २००८-२००९ चे मंजूर दरामध्ये दहा टक्के वाढ धरून येणारे रूपये ४२९/- (रूपये चारशे एकोणतीस फक्त ) प्रति विधंन विहीर या दरास मंजूरी देण्यांत येत आहे.

संबंधीत एजन्सी या दराने काम करावयास तयार नसल्यास या कामासाठी फेर निविदा मागविण्यांत याव्यात. तसेच नामंजूर निविदा दर धारक यांची टेंडर बयाना रिफंड करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत करावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- ११७ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - ११७ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रेकॉर्ड विभागामार्फत सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षासाठी लागणारे रजिस्टरे, फॉर्मस्, पावतीबुके इत्यादीची छपाई करून घेणे कामी वर्तमान पत्रामध्ये जाहिर निविदा प्रसिध्द करून जाहिर निविदा मागविणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- रेकॉर्ड विभाग जा.क्र. २७३/ दि. २७/०१/२०१०

सादर,

विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, रेकॉर्ड विभागामार्फत महानगरपालिकेच्या कार्यालयीन कामकाजाकरीता लागणारे रजिस्टर,फॉर्मस, पावती बुके, इत्यादी मागणी नुसार मंजुर टेंडर दराने छपाई करून देण्यात येतात.

छपाई टेंडर दर प्रसिध्द करणे,तुलनात्मक तक्ता करणे व स्थायी समितीकडे मान्यतेस्तव ठेवणे यासाठी बराच कालावधी लागत असल्याने सन २०१०-२०११चे आर्थिक वर्षासाठी वर्तमान पत्रात जाहीर निविदा प्रसिध्द करून जाहीर निविदा मागविणे बाबत मान्यत मिळणेस विनंती आहे. **/अ**

येणे प्रमाणे रेकॉर्ड किपर, यांचा अहवाल असे.

मुख्यलेखापरिक्षकः-प्रस्तावीत"**अ**"प्रमाणे जाहीर निविदा मागवून छपाई काम करणेस हरकत नाही. दि.५/०१/१०

मुख्यलेखाअधिकारीः-सन१०-११या आर्थिक वर्षासाठी छपाईसाठी जाहीर निविदा मागविणे योग्य. दि.६/०१/१०

मा.उपायुक्त साहेब (कर):- **"अ"** नुसार स्थायी समिती समोर निविदा प्रसिध्दीस्तव सादर करणेच्या मान्यतेस्तव सादर. दि.१३/०१/२०१०

मा.आयुक्त साहेब :- **"अ"** मान्य दि.१३/०१/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- रेकॉर्ड विभागामार्फत सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाकरिता लागणारे रजिस्टरे, फॉर्मस, पावती बुके इत्यादी ची छपाई करून घेणे कामी जाहिर निविदा मागविणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. कांबळे र.द.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे रेकॉर्ड विभागामार्फत सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षासाठी लागणारे रजिस्टरे, फॉर्मस्, पावतीबुके इत्यादीची छपाई करून घेणे कामी वर्तमान पत्रामध्ये जाहिर निविदा प्रसिध्द करून जाहिर निविदा मागविणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. कांबळे रवी दगडू.

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडू जयंवत.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०

विषय क्रमांक- ११८ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - ११८ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार सौ. सय्यद ताहेरा लतीफ घर नं.२४/१० मुकुंदनगर यांचे घराचे नळ कनेक्शन बंद केलेले असल्याने सन १९९८ ते २००९ अखेरचे रूपये १७,४४८/- चे नजर चुकीने त्यांना दिलेले बील निर्लेखित करण्यांस व कर्तव्यात कसुर करण्या-या संबंधीत कर्मचा-यावर शिस्तभंग कार्यवाही करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- दिनांक २१/७/२००९ सादर-विषय- नळ कनेक्शन बंद असतांना लागलेली पाणीपट्टी रद्द करणेबाबत.

विनंती रिपोर्ट प्रभाग समिती क्र.३ वॉर्ड क्र.८७ वसुली मदतनीस कडून देण्यात येतो की, सौ. सय्यद ताहेरा लतीफ यांनी घर न.२४/१० मुकुंदनगर या ठिकाणी १९९१ साली नळ कनेक्शन बंद करूनही पाणीपट्टी येत आहे. तरी सदर कनेक्शन बंद केले असल्यामुळे सदर पाणी पट्टी रद्द करणेस दि.२३/०६/२००९ रोजी इकडेस प्राप्त झालेला आहे.

तरी अर्जदार यांनी अर्ज देवुन सदर नळ कनेक्शन दि.८/१२/१९९१ रोजी बंद करण्यात आले आहे. याबाबत पाणीपुरवठा विभागातील डिमांड रजिस्टर मध्ये जा.क्र. ५४ दि.१२/०९/१९९१ ने अ.क्र. ९६९ पान नं.१०४ वर बंद केल्याची नोंद आहे.

परंतु सदरचे नळ कनेक्शन बंद केल्याचे दुरूस्ती संगणक नोंदणीत करण्यात आली नाही त्यामुळे नजरचुकीने १९९८ ते २००९ अखेरची पाणीपट्टी रूपये १७,४४८/- चे बिल अर्जदारास देण्यात आले आहे. तरी सदरचे बिल रद्द करून संगणक मध्ये नळ कनेक्शन बंद करून व वरील पाणीपट्टीचे बिल रद्द करण्यास आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वॉर्ड क्र.८७ मदतनीस प्रभाग समिती क्र.३ झेंडीगेट यांचा अहवाल असे.

कर निरिक्षक प्र.स.क्र.३ :- मदतनीस यांचा अहवाल व डिमांड रजि. वरील नोंद पाहता, सन १९९१ पासून पाणी पट्टी आकारणी रद्द करणेस शिफारस आहे. दि.२१/७/०९ **/अ**

प्रभाग समिती क्र.३ प्रमुख :- सहाय्यक करमुल्य निर्धारक अधिकारी यांचे मार्फत मान्यतेस्तव सादर . दि.२३/७/०९

--**--

सादर,

प्रस्तुत प्रकरणी मिळकत धारक सौ. सय्यद ताहेरा लतीफ घर नं.२४/१० , मुकुंदनगर या घराचे १/२ इंची नळ कने. दिनांक २/८/१९९१ रोजी बंद करण्यात आल्याचे पाणी पुरवठा नळ नोंदचे रजिष्ट्ररला घेतलेली आहे. तसेच सदर बाबतची माहिती वसुली विभागाकडे पाठविण्यात आलेली होती. परंतु वसुली विभागाने सदर नळ बंद ची नोंद न घेतल्याने संबंधीत मिळकत धारक यांना सन १९९८ ते २००९ पर्यत रूपये १७,४४८/- चे बील देण्यात आलेले आहे. **/अ**

दिनांक २२/७/०९ रोजी झोन क्र.३ चे फिटर यांनी समक्ष पाहणी केली असता सदरचे नळ कने. पूर्वीच बंद केल्याचे नमुद केलेले आहे. तरी प्रभाग समिती क्र.३ यांचे मार्फत सादर केलेला प्रस्ताव **"अ"** प्रमाणे मान्यतेस्तव शिफारस आहे.

तसेच प्रभाग अधिकारी यांनी सदरची रक्कम निर्लेखित करणे बाबत म.न.पा. अधिनियमातील तरतुदी नुसार कलम १५२ अन्वये प्रस्ताव सादर करणे उचित होईल. **/ब**

येणेप्रमाणे सहाय्यक मुल्य निर्धारक करसंकलन अधिकारी यांचा अहवाल असे.७/०८/०९

मुख्य लेखा परिक्षक :- वरील प्रस्तावीत **"अ"** व **"ब"** निर्लेखित करणेसाठी रवाना दि.३/११/०९ **/अ**

प्र.स.क्र.३ प्रभाग अधिकारी :- मान्यतेस्तव सादर. दि.१८/११/०९

मा.उपायुक्त साहेब (कर) :- प्रस्तावीत बाबत संबंधीत कर्तव्यात कसुर करणा-या कर्मचा-याविरूध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही नियमानुसार होणे योग्य तसेच सदरचे प्रकरण निर्लेखित बाबत **"अ"** नुसार मा.स्थायी समिती समोर सादर करणेचे मान्यतेस्तव सादर. दि.०२/१२/०९

मा.आयुक्त साहेब :- कसूर करणा-या कर्मचा-याची जबाबदारी निश्चित करावी. दि.१०/१२/०९

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मुंकुदनगर येथील सौ. सय्यद ताहेरा लतीफ, घर नं. २४/१० यांचे घरास दिलेले नळ कनेक्शन बंद केलेले असल्याने त्याना दिलेले चुकीचे बील निर्लेखित करण्यांस व कर्तव्यात कसुन करणा-या संबंधीत कर्मचा-यावर शिस्तभंग कारवाई करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे शि.बा. :- मा.स्थायी समितीपुढे अशा प्रकारचे विषय दर वेळेस असतात.

मा.श्री. पवार बा.रे.:- माझे ओपन प्लॉटला पाणी पट्टीचे बील दिलेले आहे. पाणी पट्टी चुकीने रूपये ६,०००/- आकारलेली आहे.

मा.श्री. गव्हाळे वि.ना.:- महानगरपालिका हद्दीमध्ये दिलेल्या बोगस नळ कनेक्शनची नोंद कुठेही नाही.

मा.सभापती साहेब :- नळ कनेक्शनच्या नोंदी होणे आवश्यक आहे. बोगस नळ कनेक्शन आहेत. नागरिकांना चुकीची बीले देवुन मनस्ताप दिला जातो. अशा प्रकारे चुकीची कारवाई करणारे कर्मचा-यांवर कारवाई करणेत यावी.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- सभापती महोदय मा.उपायुक्त डॉ.श्री. जावळे साहेब स्वतः लक्ष देवुन स्टापची चौकशी करून चुकीची कारवाई करणारे संबंधीत कर्मचा-यांवर कारवाई करतील बॅन्केचे कारभारामध्ये चुका होत नाहीत. आपले कडेस होतात. प्रभाग अधिकारी यांना आदेश देण्यांत यावेत. चुकीच्या नोंदी तपासून संबंधीतावर कारवाई करावी.

मा.श्री. पवार बा.रे.:- प्रस्ताव क्रमांक ११८ ते १२५ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत यावेत. चुकीची कारवाई करणारे संबंधीत कर्मचा-यांवर कारवाई करण्यांत यावी.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- प्रस्ताव क्रमांक ११८ ते १२५ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत यावेत.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव क्रमांक ११८ ते १२५ चे कार्यालयीन प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यांत यावेत. चुकीची कारवाई करणारे संबंधीत कर्मचा-यावर कारवाई करणेत यावी.

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार सौ. सय्यद ताहेरा लतीफ घर नं.२४/१० मुकुंदनगर यांचे घराचे नळ कनेक्शन बंद केलेले असल्याने सन १९९८ ते २००९ अखेरचे रूपये १७,४४८/- चे नजर चुकीने त्यांना दिलेले बील निर्लेखित करण्यांस व कर्तव्यात कसुर करण्या-या संबंधीत कर्मचा-यावर शिस्तभंग कार्यवाही करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

--**--

**<u>ठराव :-</u>** अर्जदार सौ. सय्यद ताहेरा लतीफ घर नं.२४/१० मुकुंदनगर यांचे घराचे नळ कनेक्शन बंद केलेले असल्याने सन १९९८ ते २००९ अखेरचे रूपये १७,४४८/- (रूपये सतरा हजार चारशे अठ्ठेचाळीस फक्त) चे नजर चुकीने त्यांना दिलेले बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

तसेच अशा प्रकारे चुकीचे पाणीपट्टी आकारणी करणा-या, कर्तव्यात कसुर करणा-या संबंधीत कर्मचा-यांवर शिस्तभंग कारवाई करण्यांत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- ११९ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - ११९ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्रीमती मेहरून्निसा शेख बशीर, रा. दरबार कॉलनी मुकुंदनगर अहमदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना सन २००३ सालापासून दिलेले पाणी पट्टी रूपये १३,९४८/- चे बील निर्लेखित करण्यांस व संबंधीत कर्मचा-यावर कारवाई करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रभाग समिती क्र.३ जा.क्र. ८७ दिनांक १/७/२००९

विषय- अर्जदार श्रीमती मेहरून्निसा शेख बशिर, रा. दरबार कॉलनी, मुकुंदनगर, अहमदनगर यांचा दिनांक २/६/२००९ चा अर्ज.

सादर,

अर्जदार श्रीमती मेहरून्निसा शेख बशिर यांनी गेले पंधरा वर्षापासून या परिसरातील रहिवासी असुन वारंवार पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन नसतांना नळ पट्टी दिली जाते आपल्या कार्यालयात येवुनही पाण्याचे कनेक्शन दिले जात नाही या बाबत दिनांक २/६/२००९ रोजी इकडेस अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदार यांचे सदर अर्जावरून जागेची समक्ष पहाणी करून सदर ठिकाणी पिण्याचे पाण्याचे कनेक्शन आहे किंवा नाही याबाबतचा अहवाल सादर करणे बाबत प्रभाग समिती क्रमांक ३ मधील पाणी पुरवठा विभागाचे फिटर श्री. ससाणे यांना दिनांक ४-६-०९ रोजी कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार त्यांनी अर्जदार श्रीमती मेहरून्निसा शेख बशिर यांचे घरी नळ कनेक्शन आढळून येत नाही अस्तीत्वात नाही याबाबत दिनांक ५/६/०९ रोजी अहवाल सादर केलेला आहे.

सदर प्रकरण प्रभाग समिती क्रमांक ३ मधील पाणी पुरवठा विभागाचे अभियंता यांचेकडेस डिमांड रजिष्टरची पडताळणी करून अहवाल सादर करणेत यावा या विषयी इकडील जा.क्र. १९३ दिनांक २/६/०९ अन्वये कळविले असता त्यांनी त्यांचेकडील जा.क्र. २९२ दिनांक २०/६/०९ अन्वये पाणी पुरवठा डिमांड रजिष्टरला पडताळणी केली असता सदर नावाची नोंद आढळून येत नाही याबाबत इकडेस कळविलेले आहे.

अर्जदार यांचे दिनांक २/६/०९ चे अर्जाप्रमाणे तसेच या कार्यालयाकडील घरपट्टी पाणी पटटीची उपलब्ध अभिलेख (टाचण रजिष्टर) पाहता सदरची मिळकत ही भोगवटादार श्रीमती मेहरून्निसा शेख बशिर यांचे नाव असून सदर मिळकतीवर घरपट्टी रक्कम रूपये ३१७८/- व पाणी पट्टी रक्कम रूपये १३९४८/- असे एकूण १७१२६/- इतकी थकबाकी आहे.

सदर मिळकतीचे मुळ मालक भोगवटादार श्रीमती मेहरून्निसा शेख बशिर यांचा अर्ज तसेच प्रभाग समिती क्रमांक ३ चे फिटर यांचा अभिप्राय पहाता अर्जदार यांचे जागी पिण्याचे पाण्याचे कनेक्शन आढळून येत नाही. वास्तविक टाचण रजिष्टरला असलेली थकबाकीची रक्कम याचा विचार करता मा.सहा मुल्य निर्धारक अधिकारी तथा कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय घेणे संयुक्तीक वाटते.

सबब पुढील आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे कर निरीक्षक, यांचा अहवाल असे. दि.२९/६/०९

मा. प्रभाग अधिकारी :- सहा. आयुक्त निर्धारक अधिकारी

सहा. मुल्य निर्धारक तथा करसंकलन अधिकारी :- कर निरीक्षक प्र.स.क्र.३ यांस, सदर ठिकाणी नळ कनेक्शन कधी पासून नाही ? फिटर यांचा अभिप्राय / शाखा अभियंता यांचा अभिप्राय / मेकॅ. इंजि. पा.पु. विभाग यांच्या अभिप्रायासह नळ कनेक्शन कोणत्या वर्षापासून नाही याचा स्पष्ट खुलासा आवश्यक आहे. वॉर्डातील अभिलेखावर / डिमांड रजि. नोंदी आहेत किंवा कसे ? तसेच उपरोक्त रक्कम निर्लेखित करणेबाबत म.न.पा. अधिनियम / पा.पु. उपविधी यासह सादर करावे. दि. ४/०७/०९

दिनांक ३१/७/०९

सादर,

वॉ.क्र.८८चे अभिलेख(टाचण रजिष्टर) नोंदी पहाता सदर जागेवर सन२००३ पासून पाणी पट्टीची नोंद असल्याचे दिसून येते तथापी नळ फिटर व पाणी पुरवठा विभागाकडील डिमांड रजिष्टर पहाता सदर जागेत पिण्याचे पाण्याचे नळकनेक्शन नसल्याचे दिसून येते त्यानुसार लेखी अभिप्राय अहवालासोबत सादर केलेले आहे.

अर्जदार यांच्या सदर जागेची पाणी पट्टीची रक्कम ही नळ फिटर व पाणी पुरवठा विभागाकडील लेखी अभिप्रायानुसार अर्जदार यांच्या जागेत पिण्याच्या पाण्याचे नळ कनेक्शन नसल्याचे सिध्द होते.

अर्जदार यांना येणारी पाणीपट्टीची रक्कम माफ करून, पाणीपट्टी बील रद्य करावयाचे झाल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ अन्वये पाणीपट्टी कराची रक्कम निर्लेखित करणे संयुक्तीक वाटते.

सबब पुढील आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे कर निरीक्षक यांचा अहवाल असे. दि.३१/०७/०९

मा. प्रभाग अधिकारी :- सबब पुढील आदेशार्थ सादर.

सहा. मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी :- सादर- कर निरिक्षक यांचे अहवालानुसार नळ कनेक्शन नसतांना पाणी पट्टीची आकारणी केलेली आहे. त्यामुळे उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार रू.१३,९४८/- इतका पाणीपटटीचा कर निर्लेखित करणे आवश्यक आहे. तरी सदरच्या विषय मा.स्थायी समिती पुढे ठेवणे विषयी आदेशार्थ सादर. दि.२९/०९/०९ **/अ**

ज्यु.इंजिनिअर :- प्रभाग अधिकारी यांचे मार्फत पुढील कार्यवाहीसाठी दि.०७/१०/०९

मा.उपायुक्त (कर)साहेब :- १) मु.ले.प. २) मु.ले.अ. द्वारे सादर करा. दि. २८/१०/०९

मुख्य लेखा परिक्षक :- नळ कनेक्शन नसताना पाणी पुरवठा मागणी कशी आकारणी केली यास जबाबदार कोण याची माहिती तीन दिवसात सादर करावी. मालमत्ता धारकांचे डिमांड रजिष्टर दाखवावे. (प्र.अ.समक्ष) दि.३१/१०/०९ /**अ**

प्रभाग अधिकारी :- श्री. रावस **"अ"** प्रमाणे माहिती समक्ष दाखवावी. दि.११/०९/०९

मुख्य लेखा परिक्षक :- पाणी पट्टीची रक्कम रू.१३,९४८/- निर्लेखित करणे बाबत सदरचा विषय स्थायी समिती समोर ठेवणेस हरकत नाही. दि. ३/१२/०९

मुख्य लेखा अधिकारी :- १) सन २००३ पासून कर निरिक्षक यांनी बीले कशी दिली ?

२) बील दिल्यानंतर संबंधीतीने मनपाकडे देयकाबाबत तक्रार का केली नाही ?

३) सहा वर्षानंतर पाणीपट्टी माफीचे प्रकरण कसे उद्‌भवेले

निष्काळजीपणाबद्दल संबंधीतावर कार्यवाही करावी असे वाटते.

प्रकरण मा.स्थायी समिती समोर निर्णयार्थ सादर करणेस हरकत नाही. दि.३/१२/०९

मा.उपायुक्त (कर) साहेब :- उपरोक्त प्रस्तावीतातील क्र. १, क्र.२ बाबत आस्थापनामार्फत कारणे दाखवा नोटीस बजावणे योग्य प्रकरण निर्णयार्थ स्थायी समिती समोर सादर करणेचे मान्यतेस्तव सादर. दि.०३/१२/०९

मा.आयुक्त साहेब :- कारणे दाखवा नोटीस मध्ये मुलेअ यांच्या १ ते ३ मुद्दा बाबत खुलासा मागविण्यात यावा आर्थिक नुकसातीस जबाबदार धरून कारवाई करावी. दि. ०४/१२/०९

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्रीमती मेहरून्निसा शेख बशीर, रा. दरबार कॉलनी मुकुंदनगर अहमदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना सन २००३ सालापासून दिलेले पाणी पट्टी रूपये १३,९४८/- चे बील निर्लेखित करण्यांस व संबंधीत कर्मचा-यावर कारवाई करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

--**--

**ठराव :-** अर्जदार श्रीमती मेहरून्निसा शेख बशीर, रा. दरबार कॉलनी मुकुंदनगर अहमदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना सन २००३ सालापासून दिलेले पाणी पट्टी रूपये १३,९४८/-(रूपये तेरा हजार नउत्र्शे अठ्ठेचाळीस फक्त )चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

तसेच अशा प्रकारे चुकीची पाणीपट्टी आकारणी करणा-या, कर्तव्यात कसुर करणा-या संबंधीत कर्मचा-यांवर शिस्तभंग कारवाई करण्यांत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- १२० बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - १२० बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-**अर्जदार श्री. सुभाष शांताराम मधुरकर, रा.फकिरवाडा घर नं.८२ गौरवनगर, अहमदनगर यांचे घराचे नळ कनेक्शन बंद असतांना त्यांना दिलेले रूपये १२,२००/-चे पाणी पट्टीचे बील निर्लेखित करण्यांस व कर्तव्यात कसुर करणा-या संबंधीत कर्मचा-यावर कारवाई करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- दिनांक ४/९/२००९ सादर,

अर्जदार सुभाष शांताराम मधुरकर रा. फकीरवाडा घर नंबर ८२ गौरवनगर, अहमदनगर यांनी दिनांक १९/३/२००९ रोजी सन १९९४ ते ९७ सालामध्ये पावती क्रमांक १३९७९९ दिनांक १५/१०/९६ अन्वये पाणीपट्टीची रक्कम भरून नळ कनेक्शन बंद करणे बाबत दिनांक १५/१०/९६ रोजी अर्जदाराने अर्ज दिलेला आहे. परंतु त्यापुढेही पाणीपट्टी सुरू राहीली व सन २००८-२००९ अखेर पाणीपट्टी रूपये १२,२००/- इतकी थकबाकी दर्शविली आहे. तथापि सन १९९६-९७ सालात पाणीपट्टी टाचण रजिष्टर शहर पाणी पुरवठा वसुली विभागात असल्याने संबंधीत पाणीपट्टी वसुली क्लार्क यांनी अर्जदार यांचा अर्ज पाणी पट्टी रजिष्टरला खतवून नळ कनेक्शन बंद केल्याचा शेरा दिला नसल्याने पाणी पट्टी प्रत्येक वर्षी वाढत गेली.

आज दिनांक ७/७/०९ रोजी अर्जदार यांचे अर्जावरून समक्ष पहाणी केली असता सदर घर नंबर ८२ ला पाण्याचे कनेक्शन आढळून आलेले नाही. पाणी पुरवठा विभागाकडील जा.क्र. ६६ दिनांक १७/४/२००९ अन्वये इकडील जा.क्र. ७८ दिनांक ४/११/९६ ने अर्जदार यांचे १/२ इंची नळ कनेक्शन दिनांक ३१/१०/९६ रोजी बंद करून हेडवसुली विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेले असून त्याबाबत डिमांड रजिष्टरला नोंद घेण्यात आलेली आहे. त्यानुसार नोंद घेवून त्याबाबत अर्जदार यांना आपल्या विभागामार्फत कळविण्यात यावे. याविषयी इकडेस कळविले आहे. तथापी पाणी पुरवठा विभागाकडील वरील पत्रानुसार कोणतीही कार्यवाही तत्कालीन हेडवसुली विभागाने केलेली नाही.

प्रभाग समिती क्रमांक ३ मधील पाणी पुरवठा विभागाकडील नळ फिटर श्री. ससाणे यांचा दिनांक ३-९-२००९ च्या अभिप्रायानुसार सदर जागेत पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन नसल्याने तसेच पाणी पुरवठा विभागाकडील पत्र क्रमांक ६६ दिनांक १७/४/०९ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार पाणी पट्टी कर निरलीखीत करणे संयुक्तीक वाटते आलेली १२२००/- रू. पाणी पट्टी रद्द **/अ**

येणे प्रमाणे वसुली क्लार्क / मदतनीस प्रभाग समिती क्र.३ यांचा अहवाल असे.

कर निरीक्षक प्र.स.क्र.३:-वसुली मदतनीस यांचे अहवालाप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम१५२ नुसार पाणीपट्टी कर निर्लेखित करणे संयुक्तीक वाटते. सबब आदेशार्थ सादर. दि.४/९/०९ / **अ**

मा. सहा. मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी :- रिव्हीजन विभाग अहवाल देणे दि.५/०९/०९

सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी :- सादर, प्रस्तुत प्रकरणी पाणी पुरवठा विभागाने सदर मिळकतीचे १/२ " नळ कने. दि.३१/१०/९६ रोजी बंद केल्याचे नमुद केलेले आहे. तरी कर निरिक्षक यांनी सादर केलेला प्रस्ताव **"अ"** प्रमाणे मान्यतेस हरकत नाही. दि. ०६/१०/०९

मुख्य लेखा परिक्षक :- वरील **"अ"** प्रमाणे १२,२००/- निर्लेखित करणेस मंजूर परंतु सदर विषय स्थायी समिती समोर ठेवून त्यास मंजूरी घ्यावा. दि.४/११/०९

प्रभाग अधिकारी :- मान्यतेस्तव सादर दि. १८/११/०९

मा.उपायुक्त (कर) साहेब :- प्रस्तावीत नुसार संबंधीत हेडवसुली यांचे विरूध्द कर्तव्यात कसुर केल्या प्रकरणी नियमानुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही आस्थापना विभागामार्फत प्रस्तावीत करणे योग्य.

तसेच प्रस्तावीत बाबत रक्कम निर्लेखित करणेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयार्थ सादर करणेच्या मान्यतेस्तव सादर. दि. ०२/१२/०९

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. ११/१२/०९

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**ठराव :-** अर्जदार श्री. सुभाष शांताराम मधुरकर, रा.फकिरवाडा घर नं.८२ गौरवनगर, अहमदनगर यांचे घराचे नळ कनेक्शन बंद असतांना त्यांना दिलेले रूपये १२,२००/- (रूपये बारा हजार दोनशे फक्त) चे पाणी पट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

तसेच अशा प्रकारे चुकीची पाणीपट्टी आकारणी करणा-या, कर्तव्यात कसुर करणा-या संबंधीत कर्मचा-यांवर शिस्तभंग कारवाई करण्यांत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- १२१ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - १२१ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.शेख एजाज अब्दुल हक,रा.मुकुंदनगर,अहमदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना सन२००३-२००९अखेर दिलेले रूपये ११,९९६/-चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस व चुकीचे बील देणारे संबंधीत कर्मचा-यावर कारवाई करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- अ.नगर महानगरपालिका जा.क्र. प्र.स.क्र.३ दिनांक २६/११/२००९

विषय- अर्जदार श्री. शेख एजाज अब्दुल हक, रा. मुकुंदनगर अहमदनगर यांचा दिनांक १०/११/२००९ चा अर्ज

सादर,

अर्जदार श्री. शेख एजाज अब्दुल हक यांनी दिनांक १०/११/२००९रोजी अर्ज देवून सदर ठिकाणी महानगरपालिकेची नळाचे कनेक्शन नसतांना पाणीपट्टी बील आठ वर्षानंतर आलेले आहे. परंतु मला नळ कनेक्शन नसतांना ही पाणीपट्टी आलेली आहे. तरी माझे जागेची पहाणी करून नळ कनेक्शन आहे किंवा नाही याची खात्री करून नळ पट्टीचे बील कॅन्सल करावे अशी विनंती केलेली आहे.

अर्जदार यांचे सदर अर्जावरून जागेची समक्ष पहाणी करून सदर ठिकाणी पिण्याचे पाण्याचे कनेक्शन आहे किंवा नाही याबाबतचा अहवाल सादर करणे बाबत प्रभाग समिती क्रमांक ३ मधील पाणी पुरवठा विभागाचे फिटर श्री. ससाणे यांना सांगीतले असता त्यांनी अर्जदार श्री. शेख एजाज अब्दुल हक, मुकुंदनगर , अहमदनगर यांनी दिनांक १०/११/२००९ रोजी दिलेल्या अर्जावरून नळ कनेक्शन नसतांना पाणी पट्टी आलेली रद्य करणेकामी अर्जावरून दिनांक १२/११/२००९ रोजी समक्ष ठिकाणी जावून पहाणी केली असता नळ कनेक्शन सदर घरी आढळून येत नाही अस्तीत्वात नाही याबाबत दिनांक १२/११/२००९ रोजी अहवाल सादर केलेली आहे.

श्री. शेख एजाज अब्दुल हक यांचे नांवे टाचण रजिष्टर पहाता सन २००३-२००९ अखेर सदर मिळकतीवर ११९९६/- व पाणी पट्टी इतकी थकबाकी आहे.

प्रभाग समिती क्रमांक ३ मधील पाणी पुरवठा विभागाकडील नळ फिटर श्री. ससाणे यांचा दिनांक १२/११/२००९ च्या रिपोर्टानुसार सदर जागेत पिण्याचे नळ कनेक्शन नसल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार रक्कम रूपये ११९९६/-(अक्षरी रूपये अकरा हजार नउशे शहाण्णव फक्त) पाणीपट्टी निरलीखीत करणे संयुक्तीक वाटते.

सबब पुढील आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे लिपीक, वॉ.क्र.८६ प्र.स.क्र.-३ यांचा अहवाल असे.

कर निरिक्षक प्र.स.क्र.३ :- वसुली लिपीक यांच्या अहवालानुसार आदेशार्थ सादर. दि.२६/११/०९

प्रभाग अधिकारी प्र.स.क.-३ :- मान्यतेस्तव आदेशार्थ सादर. दि.२६/११/०९

मुख्य लेखा परिक्षक / मुख्य लेखा अधिकारी :- सदर कर निर्लेखन प्रस्ताव स्थायी समितीकडे मंजूरीसाठी पाठवावे. दि.२६/११/०९

मा.उपायुक्त(कर):-सदरच्या प्रस्तावानुसार(१)पाणीपट्टीचे चुकीचे देयक अर्जदारास दिल्याबद्दल संबंधीत कर्मचारी यास कारणे दाखवा नोटीस बजावणे योग्य.(२)पाणी पट्टी निर्लेखित करण्याविषयीचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर निर्णयार्थ सादर करणे योग्य.सबब आदेशार्थ सादर.दि.२७/११/०९

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. २७/११/०९

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.शेख एजाज अब्दुल हक,रा.मुकुंदनगर,अहमदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना सन२००३-२००९अखेर दिलेले रूपये ११,९९६/-चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस व चुकीचे बील देणारे संबंधीत कर्मचा-यावर कारवाई करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

--००--

**<u>ठराव :-</u>** अर्जदार श्री.शेख एजाज अब्दुल हक,रा.मुकुंदनगर,अहमदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना सन २००३-२००९ अखेर दिलेले रूपये ११,९९६/- (रूपये अकरा हजार नउत्रशे शहाण्णव फक्त)चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

तसेच अशा प्रकारे चुकीची पाणीपट्टी आकारणी करणा-या, कर्तव्यात कसुर करणा-या संबंधीत कर्मचा-यांवर शिस्तभंग कारवाई करण्यांत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- १२२ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - १२२ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. ब्रम्हदेव निवृत्ती पवार, रा. वॉर्ड क्र.३५ प्लॉट नं.६ नवीन गांवठाण केडगांव यांचे घरास एकच अर्धा इंची नळ कनेक्शन दिलेले असल्याने त्यांना न दिलेल्या १/२" नळ कनेक्शनचे सन २००३-२००९ अखेर चे रूपये ९,०००/- चे पाणीपट्टीचे बील रद्द करण्यांस व त्याप्रमाणे रोकॅर्डला नोंद घेण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- अ.नगर म.न.पा. केडगाव उपकार्यालय/ पा.पु.विभाग दि.२१/१२/२००९

मा.सादर,

विषय- मिळकत धारकांनी कधीही दोन कनेक्शन घेतले नसताना नजर चुकीने रिव्हीजन मध्ये सन २००३ पासून आकारलेली पाणीपट्टी रद्द होणेस मंजूरी मिळणेबाबत.

संदर्भ :- श्री. ब्रम्हदेव निवृत्ती पवार, रा. वॉर्ड नं.३५ बील नं.३९८ प्लॉट नं.६, नविन गावठाण केडगांव यांचा दि. ८/१२/२००८ चा अर्ज.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, श्री. ब्रम्हदेव निवृत्ती पवार, रा. वॉर्ड नं.३५ बील नं.३९८ प्लॉट नं.६, नविन गावठाण, केडगांव यांनी दि.८/१२/२००८ रोजीच्या अर्जान्वये त्यांनी कळविले की, सदर ठिकाणी एक १/२" नळ कनेक्शन घेतलेले असून त्यांना दोन १/२" नळ कनेक्शनचे आकारण्यात आलेले पाणीपट्टीचे बील सन २००३ ते २००९ अखेर रद्द करून मिळावे असे त्यांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेले आहे.

सदर जागेवर प्रत्यक्ष पाहणी करून नजरचुकीने दोन १/२" नळ कनेक्शनची केलेली आकारणी रद्द करणेबाबतची मागणी केलेली आहे. सदर अर्जदार यांच्या अर्जाप्रमाणे पाणीपुरवठा विभागाकडील फिटर श्री. रामदास कोतकर यांना प्रत्यक्ष पाहणी करण्यास सांगितलेले असता त्यांनी प्रत्यक्ष जावून सदर ठिकाणी पाहणी केली असता १/२" एक कनेक्शन आढळून आले असा रिपोर्ट इकडेस दिलेला आहे.

तरी सदर ठिकाणी महानगरपालिकेने अद्यापपर्यत दुसरे १/२" नळ कनेक्शन दिलेले नसल्याने नजरचुकीने त्यांना सन २००३-२००९ अखेर रू.९०००/- चे पाणीपट्टीचे बील रद्द करण्यास तसेच यापुढे एक अर्धा इंची नळ कनेक्शनची पाणीपट्टी आकारण्यास तसेच सदरची नोंद संगणकावर व रेकॉर्डवर होण्यास मंजूरीस्तव सादर. तथापि आदेशार्थ सादर. **/अ**

**सोबत :-** १] सन २००४ ते २००६ पर्यत एक १/२" नळ कनेक्शनचे बील

२] सन २००४ ते २००९ पर्यत दोन १/२" नळ कनेक्शनचे बील

३] फिटर श्री. कोतकर यांचा रिपोर्ट

येणेप्रमाणे वरिष्ठ क्लार्क,कनिष्ठ अभियंता,मुख्य लिपीक,केडगांव उपकार्यालय यांचा अहवाल असे.

मुख्य लिपीक केडगांव उपकार्यालय :- मा.सादर, प्रभाग अधिकारी प्र.स.क्र. ४ यांचे मार्फत मंजुरीस्तव सादर तथापि आदेशार्थ सादर.

प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.४ बुरूडगांव :- मुख्य लिपीक यांचे अहवालानुसार मंजुरीस्तव सादर.

मुख्य लेखा परिक्षक :- वरील **"अ"** प्रमाणे कर समापन इ. बाबी स्थायी समिती पुढे मान्यतेसाठी ठेवाव्यात दि.०५/०१/१०

मा.उपायुक्त साहेब (कर):- मा.स्थायी समिती समोर निर्णयार्थ **"अ"** नुसार सादर करणे योग्य.

(१) संबंधीत चुकीची नोंद करणारे कर्मचारी यांचेविरूध्द आस्थापना विभागामार्फत शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावीत करणे योग्य. दि.१४/०१/१० **/अ**

मा.आयुक्त साहेब :- मान्य दि. १६/०१/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**<u>ठराव :-</u>** अर्जदार श्री. ब्रम्हदेव निवृत्ती पवार, रा. वॉर्ड क्र.३५ प्लॉट नं.६ नवीन गांवठाण केडगांव यांचे घरास एकच अर्धा इंची नळ कनेक्शन दिलेले असल्याने त्यांना न दिलेल्या १/२" नळ कनेक्शनचे सन २००३-२००९ अखेर चे रूपये ९,०००/- (रूपये नउ्र हजार फक्त)चे पाणीपट्टीचे बील रद्द करण्यांस व त्याप्रमाणे रोकॅर्डला नोंद घेण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

तसेच अशा प्रकारे चुकीची पाणीपट्टीची आकारणी करणा-या, कर्तव्यात कसुर करणा-या संबंधीत कर्मचा-यांवर शिस्तभंग कारवाई करण्यांत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- १२३ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - १२३ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. अंबादास सखाराम शिंदे तर्फे श्रीमती पारूबाई अंबादास शिंदे, रा. नेप्ती रोड केडगांव अर्चना हॉटेलचे मागे वॉर्ड क्रमांक ३९ यांचे घरास कुठल्याही प्रकारचे नळ कनेक्शन दिलेले नसल्याने त्यांना नजर चुकीने दिलेले सन १९९८ ते २००९ अखेर पाणीपट्टीचे रूपये १२,३७८/- चे दिलेले बील रद्द करण्यांस व त्याप्रमाणे रोकॅर्डला नोंद घेण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- अ.नगर महानगरपालिका केडगाव उपकार्यालय/ जा.क्र. ५८४ दि.१६/११/०९

मा.सादर,

विषय :-कोणत्याही प्रकारचे नळकनेक्शन घेतलेले नसतांना पाणीपटटीचे आकारण्यात आलेले बील रद्द करणे बाबत.

संदर्भ :- अर्जदार श्री. अंबादास सखाराम शिंदे तर्फे पारूबाई अंबादास शिंदे रा. नेप्ती रोड, केडगांव अर्चना हॉटेलच्या मागे, केडगांव, अहमदनगर

उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरून विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, अर्जदार श्री. अंबादास सखाराम शिंदे तर्फे पारूबाई अंबादास शिंदे रा. नेप्ती रोड केडगांव अर्चना हॉटेलच्या मागे, केडगांव अहमदनगर वॉर्ड क्र .३९ बील क्रमांक ११३८ यांनी दि.२३/९/२००९ रोजी लेखी अर्ज देवून आज अखेर कोणतेही नळ कनेक्शन घेतलेले नसल्याने सन १९९८ ते २००९ अखेर पर्यतचे पाणीपट्टीचे बील रू. १२,३७८/- चे आलेले असून सदरचे बील रद्द करण्याबाबतचे लेखी अर्ज दिला आहे.

सदर अर्जदार यांच्या अर्जाप्रमाणे पाणी पुरवठा -फिटर यांनी सदर ठिकाणी प्रत्यक्ष जाउञ्न पहाणी केली असता त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे नळ कनेक्शन दिल्याचे आढळून येत नाही असा पहाणी अहवाल दिला आहे. तसेच पाणी पुरवठयाकडील दप्तर तपासणी केली असता सदर अर्जदारास नळ कनेक्शन दिल्याचे आढळून येत नाही.

तरी पाणी पुरवठा विभाग केडगांव उपकार्यालय महानगरपालिका, अहमदनगर यांनी सदर मिळकतदार यांना सदर ठिकाणी अदयापपर्यत नळकनेक्शन दिलेले नसल्याने नजर चुकीने सन ९८/२००९ अखेर पाणीपट्टीचे दिलेले बील रू.१२,३७८/- रद्द करण्यास तसेच येथुन पुढे पाणीपट्टीची अकारणी कमी करण्यास तसेच सदरच्या नोंदी संगणकावर, टाचन रजिस्टर, इत्यादी आवश्यक ठिकाणी घेण्यास मंजुरीस्तव सादर,

तथापि, आदेशार्थ सविनय सादर,

येणे प्रमाणे वसुली क्लार्क यांचा अहवाल असे.

मुख्य लिपीक केडगांव उपकार्यालय :- मा.सादर, वसुली लिपीक यांचा सविस्तर ऑफिस रिपोर्ट तसेच पा.पु.विभागाकडील फिटर यांचा दि.३१/१०/०९ चा पाहणी अहवाल व पा.पु. विभागाकडील लिपीक यांचा ॲफिस रिपोर्टानुसार संबंधीत मालमत्ता धारक यांना सदर ठिकाणी अद्यापपर्यत नळ कने. दिल्याचे आढळून येत नाही. तरी सदरचा सविस्तर ऑफीस रिपोर्ट प्रभाग अधिकारी क्र.४ बुरूडगांव यांच्या मार्फत मंजूरीस्तव सादर तथापि आदेशार्थ. दि.७/११/०९

प्रभाग अधिकारी प्र.क्र. ४ बुरूडगांव :- सादर, पाणी पुरवठा लिपीक व नळ फिटर यांचे रिपोर्टानुसार मंजुरीस्तव सादर.

मा.उपायुक्त (कर) साहेब :- १] मु.ले.प. २] मु.ले.अ. द्वारा सादर करा. दि.२९/११/०९

मुख्य लेखा परिक्षक :- सहाय्यक कर मुल्य निर्धारक यांचे अभिप्राय घेवुन सादर करावे. दि.१०/१२/०९

सहाय्यक कर मुल्य निर्धारक :- प्राप्त अहवालानुसार नळ जोड नसतांना आकारलेली पाणीपट्टी रद्द करणेबाबत योग्य वाटते आदेशार्थ सादर. दि.१५/१२/०९

मुख्य लेखा परिक्षक :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १५२ नुसार करांचे निर्लेखित प्रस्ताव स्थायी समिती पुढे ठेवून मान्यता घ्यावी. दि.२९/१२/०९ **/अ**

मा.उपायुक्त (कर) साहेब :- १] **"अ"** नुसार प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवून मान्यता घेणे योग्य.

२] याबाबत संबंधीत कर्मचारी यांचेविरूध्द आस्थापना विभागामार्फत चुकीची आकारणी केले प्रकरणी शिस्तभंग विषयक कार्यवाही करणेचे मान्यतेस्तव सादर. दि.१४/०१/२०१०

मा.आयुक्त साहेब :- मान्य दि. १८/०१/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**ठराव :-** अर्जदार श्री. अंबादास सखाराम शिंदे तर्फे श्रीमती पारूबाई अंबादास शिंदे, रा. नेप्ती रोड केडगांव अर्चना हॉटेलचे मागे वॉर्ड क्रमांक ३९ यांचे घरास कुठल्याही प्रकारचे नळ कनेक्शन दिलेले नसल्याने त्यांना नजर चुकीने दिलेले सन १९९८ ते २००९ अखेर पाणीपट्टीचे रूपये १२,३७८/-(रूपये बारा हजार तीनशे अठ्ठयाहत्तर फक्त) चे दिलेले बील रद्द करण्यांस व त्याप्रमाणे रोकॅर्डला नोंद घेण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

तसेच अशा प्रकारे चुकीची पाणीपट्टीची आकारणी करणा-या, कर्तव्यात कसुर करणा-या संबंधीत कर्मचा-यांवर शिस्तभंग कारवाई करण्यांत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- १२४ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - १२४ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. ठकप्पा खंडु गवळी (काटकर) वॉर्ड क्र.२ घ. नं. ७५१/५२ तोफखाना यांचे घरास दिलेल्या नळ कनेक्शनचे पाण्याचा वापर पिण्यासाठी होत असल्याने त्यांना दिलेल्या नळ कनेक्शनची जादा दराने लावलेली पाणीपट्टी पिण्याचे दराने लावणेस व तशी संगणक विभागाकडेस नोंद करणेस मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- अ.नगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२
मा.उपायुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका.

विषय :- पिण्याचे दराप्रमाणे पाणीपट्टी आकारणेबाबत.

विनंती पूर्वक रिपोर्ट की, अर्जदार श्री. ठकप्पा खंडु गवळी (काटकर) वॉर्ड क्र.२ घ.नं. ७५१/५२ तोफखाना या ठिकाणी ३/४ नळकनेक्शन वाणिज्य वापरासाठी घेतले होते. परंतु १२/११/९० रोजी आमच्याकडे वाणिज्य वापर नसुन सदर पाण्याचा वापर पिण्यासाठी करीत आहोत असा अर्ज होता सदर अर्जावर पाणी पुरवठा-फिटर यांचा शेरा देखील आहे. सदर पाण्याचा वापर पिण्यासाठी होत आहे.

सदर नळाची पाणीपट्टी पिण्याच्या दराने आकारणेबाबत त्यांचा दि.४/७/९८ व २३/९/०८ रोजीचे अर्जसुध्दा जोडलेले आहेत. तसेच सद्याही सदर नळाचा वापर पिण्यासाठी करीत असलेबाबत समक्ष पाहणीत दिसून आले आहे. तरी सदर नळावर सन १९९६-९७ पासून सन २००९-१० अखेर रू.५६६२०/- बाकी आहे. सदरची बाकी पिण्याचे दराप्रमाणे रू.२८३१०/- इतकी होत आहे. परंतु सदरची रक्कम रू.२८३१०/- वसुल करून

तरी उर्वरीत रक्कम रू.२८३१०/- ही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कराधान प्रकरण ८ नियम २०(१) (क) नुसार संगणकामध्ये नोंद घेण्यास व सदर नळाची जादा दराने लावलेली पाणीपट्टी पिण्याचे दराने लावणे व तशी संगणक विभागास नोंद करून घेणेस मंजुरी मिळावी ही विनंती. **/अ**

तसेच कलम १५२ नुसार वसुल न होणारी रक्कम रू.२८३१०/- निर्लेखित करणेस मा.स्थायी समिती पुढे ठेवणेस मान्यता मिळावी. **/ब**

येणे प्रमाणे कर निरिक्षक व प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.२ यांचा अहवाल असे.

सहाय्यक मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी :- सहमती दर्शक सही दि. १७/०३/१०

अंतर्गत लेखा परिक्षक :- सादर, प्रभाग अधिकारी यांचे प्रस्तावाप्रमाणे मा.स्थायी समिती चे मंजुरीस्तव ठेवणेस मान्यतेस्तव आदेशार्थ.

मुख्य लेखा अधिकारी :- **"अ "** मान्यतेसाठी दि.१९/०३/२०१०

मा.उपायुक्त (कर) साहेब :- **"अ"** नुसार प्रस्तावीत मान्य **"ब"** नुसार स्थायी समिती समोर निर्णयार्थ सादर करणेस्तव मान्यतेस्तव.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. ठकप्पा खंडु गवळी (काटकर) वॉर्ड क्र.२ घ. नं. ७५१/५२ तोफखाना यांचे घरास दिलेल्या नळ कनेक्शनचे पाण्याचा वापर पिण्यासाठी होत असल्याने त्यांना दिलेल्या नळ कनेक्शनची जादा दराने लावलेली पाणीपट्टी पिण्याचे दराने लावणेस व तशी संगणक विभागाकडेस नोंद करणेस मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

--०० --

**ठराव :-** अर्जदार श्री. ठकप्पा खंडु गवळी (काटकर) वॉर्ड क्र.२ घ. नं. ७५१/५२ तोफखाना यांचे घरास दिलेल्या नळ कनेक्शनचे पाण्याचा वापर पिण्यासाठी होत असल्याने त्यांना दिलेल्या नळ कनेक्शनची जादा दराने (वाणिज्य वापर दराने ) लावलेली पाणीपट्टी पिण्याचे दराने लावणेत यावी व वसुल न होणारी रक्कम रूपये २८,३१०/-(रूपये अठ्ठावीस हजार तीनशे दहा फक्त) निर्लेखित करण्यांस व तशी संगणक विभागाकडेस नोंद करणेस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

तसेच अशा प्रकारे चुकीची पाणीपट्टीची आकारणी करणा-या, कर्तव्यात कसुर करणा-या संबंधीत कर्मचा-यांवर शिस्तभंग कारवाई करण्यांत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर. सही /-

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- १२५ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - १२५ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे वसुली वॉर्ड क्र.८६ व ८८ या दोनही वसूली वॉर्डचे रेकॉर्डला डॉ. रिजवाना सुलतान खान, डॉ. कमरून्नीसा आबीदखान, श्री. सय्यद इलीयास गफूर, श्री. महमंद हुसेन जहूर शेख, श्री. सलीमा इसहाक या मालमत्ता धारकांचे मालमत्तेची नजर चुकीने झालेल्या नोंदी पैकी वॉर्ड क्र.८८ मधील नोंद रद्द करणेस व सन २००८-२००९ पासूनचा ओपन, प्लॉट वरील कर निर्लेखित करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसुली विभाग दि.२०/१/२०१०

विषय- वॉ.क्र. ८६ व ८८ मध्ये दोन वॉर्डात एकाच मालमत्ताधारकाचे डबल नोंदी झालेबाबत.

संदर्भ :- सय्यद हाफिजोद्यीन सय्यद राजा यांचा दिनांक १७/१२/०९ चा अर्ज.

सादर,

विनंती रिपोर्ट की, सय्यद हाफीजोद्यीन सय्यद राजा व इतर हे वॉ.क्र. ८६ मध्ये रहात असून वॉ.क्र. ८६ मध्ये डॉ. रिजवाना सुलतान खान, डॉ. कमरून्नीसा आबीदखान, सय्यद इलीयास गफूर, महमंद हुसेन जहूर शेख, शेख सलीमा इसहाक अशी असून सदर मिकळतधारक हे वॉ.क्र. ८६ मध्ये राहात असून त्यांचे परत वॉर्ड क्रमांक ८८ मध्ये दर्यादायरा रोड येथे नजरचुकीने संगणकामध्ये नोंद झाल्याचे आढळून आलेले आहे. वॉ.क्र. ८८ मध्ये वरील मिळकतधारकांचे डबल सिंगल फॉर्म व अ पुस्तक येथे नोंदी आढळून येत नाही.

तरी वॉर्ड क्रमांक ८८ मधील डॉ. रिजवाना सुलतान खान, डॉ. कमरून्नीसा आबीदखान, सय्यद इलीयास गफूर, महमंद हुसेन जहूर शेख, शेख सलीमा इसहाक हया नोंदी संगणक मधून रद्य करणे बाबत आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वसुली मदतनीस वॉ.क्र. ८८ प्रभाग समिती क्र.३ यांचा अहवाल असे.

कर निरीक्षक प्रभाग समिती क्र.२ :- सादर, समक्ष पहाणी केली असता वरील मालमत्ताधारक वॉ.नं. ८६ मध्ये राहात असून वॉ.नं. ८८ मध्ये राहत नसून अ फार्म वर सुध्दा नोंदी नाही तरी वॉ.नं.८८ चे मधील नावे रद्द होवुन वॉ.नं. ८६ मध्ये आहे ते तसेच ठेवण्यास आदेशार्थ सादर असे. दि.२०/१/१०

मा. प्रभाग अधिकारी :- मान्यतेस्तव आदेशार्थ सादर दि. २१/१/१०

मा. सहाय्यक मुल्य निर्धारक अधिकारी :- श्री. सुनील चाफे, रिव्हीजन विभाग तपासून सादर करा.

सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी :- सादर, सदर प्रकरणी कार्यलयीन पशिरिष्ठ **"अ"** पाहता वॉर्ड क्रमांक ८६ मध्ये अर्जदार सय्यद हाफीजोद्दीन सय्यद राजा व इतर या मिळकत धारकांच्या इमारतीच्या चटई क्षेत्राप्रमाणे सन २००८-२००९ मध्ये नविन बांधकामाच्या नोंदी घेवुन कर आकारणी केल्याचे निदर्शनास येते तसेच पूर्वी वॉर्ड क्रमांक ८८ मध्ये अर्जदार व इतर यांचे ओपन प्लॉटचे नोंद घेवुन सन २००३-०४ च्या रिव्हीजन मध्ये आकारणी केलेली आहे.

वसुली लिपीक यांनी नविन बांधकामाच्या नोंदी वॉर्ड क्रमांक ८६ मध्ये घेतलेल्या आहेत. तरी सदर मिळकत धारक यांचे वॉर्ड क्रमांक ८८ मधील ओपन प्लॉटच्या नोंदी रद्द करण्यास हरकत नाही. **/अ**

तरी मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियम १९४९ मधील प्रकरण-८ कराधान नियम २० (१) (क) अन्वये दुरूस्ती करून अधिनियमातील कलम १५२ नुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेने ओपन प्लॉट वरील सन २००८-०९ पासूनचा कर निर्लेखित करणे योग्य होईल. तथापि आदेशार्थ सादर. दि.१५/३/१० अंतर्गत लेखा परिक्षक :- सादर, सहाय्यक मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी यांचे शिफारसीप्रमाणे मा.स्थायी समितीचे मंजुरीने प्रस्तावाप्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही. **/ब**

मा.उपायुक्त (कर) साहेब :- **"अ"** प्रस्तावीतनुसार वॉर्ड क्र.८८ मधील नोंद रद्द करणेस मु. प्रां. म.न.न.पा. अधिनियम १९४९ कराधान नियम प्रकरण-८ २० (१) अन्वये नोंद रद्द करणेस मान्य करावा.

**"ब"** नुसार कर निर्लेखित बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजूरीस्तव सादर करणेस्तव मान्यतेस्तव. दि.१९/०३/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे वसुली वॉर्ड क्र.८६ व ८८ या दोनही वसूली वॉर्डचे रेकॉर्डला डॉ. रिजवाना सुलतान खान, डॉ. कमरून्नीसा आबीदखान, श्री. सय्यद इलीयास गफूर, श्री. महमंद हुसेन जहूर शेख, श्री. सलीमा इसहाक या मालमत्ता धारकांचे मालमत्तेची नजर चुकीने झालेल्या नोंदी पैकी वॉर्ड क्र.८८ मधील नोंद रद्द करणेस व सन २००८-२००९ पासूनचा ओपन, प्लॉट वरील कर निर्लेखित करणस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

तसेच अशा प्रकारे चुकीची नोंद करणा-या, कर्तव्यात कसुर करणा-या संबंधीत कर्मचा-यांवर शिस्तभंग कारवाई करण्यांत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- १२६ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - १२६ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेस सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिता नारळी खराटे, मोलाचे कुंचे,परंवाकृती गोलाकार झाडू इ. खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग दिनांक १४/१२/२००९

विषय- सन २००९-१० या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस नारळी खराटे, मोलाचे कुंचे, पंखाकृती गोलाकार झाडू इ. पुरवठा निविदा दर मंजुरी बाबत.

सादर,

विनंती रिपोर्ट की, विषयांकित निविदा प्रकरणी प्राप्त झालेल्या तीन निविदा उपस्थित निविदाकार व त्यांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत मा.मुख्य लेखापरिक्षक, मा.मुख्यालेखाधिकारी व मा.उपायुक्त(कर) यांचे समक्ष उघडलेल्या असून निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता पाहता.

**बाब नं.१**

अ.नं. १ ते ३ चे दर मे. स्वामी इंजिनिअरींग & कॉन्ट्रॅक्टर्स, अहमदनगर यांचे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी असून गत आर्थिक वर्षाच्या वार्षिक मंजूर टेंडर दराशी तुलना करता फारच जास्त आहेत. **/अ**

तरी अ.नं. १ ते ३ चे स्पर्धात्मक दृष्टया सर्वात कमीचे दर निर्णयास्तव सविनय सादर तसेच सदरचे दर मंजूर झाल्यास सन २००९-१० या आर्थिक वर्षाच्या नंतर याच मंजूर निविदा दराने सन २०१०-११ या आर्थिक वर्षाकरीता मागविण्यात येणा-या निविदा दरांचा अंतिम निर्णय होईपर्यत मालाचा पुरवठा बिनशर्त करावा लागेल अशी अट करारनामा करून घेताना नमुद करून घेवून त्याप्रमाणे माल खरेदी करण्यास व निविदा नामंजूर झाल्यास नामंजूर निविदाकार यांची निविदा बयाणा रक्कम त्यांना परत करणेस मंजुरी मिळावी ही विनंती आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख श्री. ए.जी. जाधव यांचा अहवाल असे. दि१४/१२/०९

मा. वैद्यकिय आरोग्य अधिकारी :- **"अ"** विचारात घेवुन पुरवठा दारांचे वाटाघाटीसाठी बोलावून करणे उचित वाटते. आदेशार्थ सादर. दि.२३/१२/०९

मुख्य लेखा परिक्षक :- सादर, वैद्यकिय आरोग्याधिकारी यांचे प्रस्तावाप्रमाणे मे. स्वामी इंजि. ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स यांना वाटाघाटीसाठी बोलावणेस मान्यतेस्तव.

मुख्य लेखा अधिकारी :- प्रस्तावाप्रमाणे मान्यतेस्तव. दि. २३/१२/०९

मा. उपायुक्त (कर) साहेब :- मान्य

--**-- स्टोअर विभाग दि.११/०१/२०१०

सविनय फेर सादर,

विनंती फेर रिपोर्ट की, सन २००९-१० या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस नारळी खराटे, मोलाचे कुंचे, पंखाकृती गोलाकार झाडू इ. साहित्य पुरवठा निविदा दर निगोसिएशन साठी निविदाकार मे. स्वामी इंजिनिअरींग & कॉन्ट्रॅक्टर्स, अ.नगर यांना जा.क्र. स्टोअर विभाग २०८ दि.२४/१२/२००९ अन्वये दि.२९/१२/२००९ रोजी संदर्भिय निविदेतील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमीचे दरांबाबत आवश्यक कागदपत्रासह महानगरपालिका कार्यालयात दर निगोसिएशन साठी समक्ष उपस्थित राहून सदर न्युनतम दराबाबत लेखी खुलासा करावा असे कळविले असता त्यांनी समक्ष उपस्थित राहून मा.उपायुक्तसाहेब (कर), मा.मुख्य लेखाधिकारी , मा.मुख्य लेखापरिक्षक व मा. वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांच्याशी चर्चा करून निगोसिएशन नंतर कमी करून दिलेले दर निविदा दरांच्या तुलनात्मक तक्त्यातील कॉलम नं.९ मध्ये नमुद केलेले आहेत.

तरी अ.नं. १ ते ३ चे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमीचे दर निर्णयास्तव सविनय सादर तसेच सदरचे दर मंजूर झाल्यास सन २००९-१०या आर्थिक वर्षात आरोग्य विभागाच्या मागणी प्रस्तावान्वये दि.३१ मार्च २०१० अखेरपर्यत जरूरीप्रमाणे माल खरेदी करण्यास व निविदा नामंजूर झाल्यास नामंजूर निविदाकार यांची टेंडर बयाणा रक्कम त्यांना परत करणेस मंजूरी मिळणे बाबत सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यास मंजूरी मिळावी ही विनंती आदेशार्थ सविनय सादर./**अ**

येणे प्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख श्री. ए.जी. जाधव यांचा अहवाल असे. दि ११/०१/२०१०

मा. वैद्यकिय आरोग्य अधिकारी :- **"अ"** प्रमाणे मान्यतेस्तव सादर. दि.११/०१/२०१०

मुख्य लेखा परिक्षक :- प्रस्तावीत केल्याप्रमाणे खराटे, झाडू यांचे कमी प्राप्त झालेले दर मान्यतेसाठी तसेच दि.३१ मार्च १० पर्यत मागणीनुसार साहित्य खरेदीबाबत मंजूरीसाठी स्थायी समितीपुढे ठेवणेस हरकत नाही. दि.१९/०१/२०१०

मुख्य लेखा अधिकारी :- साहित्य खरेदीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे मंजूरीस्तव ठेवणे योग्य.

मा. उपायुक्त (कर) साहेब :- **"अ"** नुसार मान्यतेसतव सादर. दि.१९/०१/२०१०

मा.आयुक्त साहेब :- मा.स्थायी समितीकडे मंजुरीसाठी पाठवावे. दि.२०/०१/२०१०

--००--

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरीता आरोग्य विभागासाठी नारळी खराटे, पंखाटाईप, गोलाकार झाडू, मोलाचे कुंचे इ. पुरविण्याबाबतचा निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता.

| अ. नं. | मालाचा तपशील | मे.स्वामी इंजिनिअरींग & कॉन्ट्रॅक्टर,अहमदनगर | मे.साईदत्त एजन्सी, अहमदनगर | मे. व्हिनस ट्रेडर्स, अहमदनगर | शेरा निगोसिएशन नंतर कमी करून दिलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | नारळी खराटे लांब जाड काडीचे प्रत्येकी ७५० ग्रॅम वजनाचे | रू. २२=००/ १ नग | रू. ४०=००/ १ नग | रू. ३०=००/ १ नग | रू.१८=००/ १ नग |
| २ | पंखाटाईप गोलाकार झाडु ५ फुट लांब भरीव बांबूच्या दांडयासह(झाडू नारळी खराटे लांब जाड काडीचा असावा.) | रू. ६५=००/ १ नग | रू. ६८=००/ १ नग | रू. ७०=००/ १ नग | रू.५५=००/ १ नग |
| ३ | मोलाचे कुंचे प्रत्येकी ३५० ग्रॅम वजनाचे | रू. ६०=००/ १ नग | रू. ६२=००/ १ नग | रू. ६५=००/ १ नग | रू.५०=००/ १ नग |

स्टोअर विभाग प्रमुख दि.१४/१२/०९

वैद्यकीय आरोग्य अधिकारी :- मे. स्वाती इंजिनिअरिंग & कॅान्ट्रॅक्टर यांचेशी वाटाघाटी करणे उचित वाटते. दि. २३/१२/०९

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेस सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिता नारळी खराटे, मोलाचे कुंचे,पंरवाकृती गोलाकार झाडू इ. खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

--oo--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिता नारळी खराटे, मोलाचे कुंचे, झाडू इत्यादी खरेदी कामी आलेल्या कमीचे दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

स्टोअर विभाग प्रमुख श्री. जाधव :- सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिता नारळी खराटे, मोलाचे कुंचे, पंखाकृती, गोलाकार, झाडू इत्यादी खरेदी कामी मागविण्यांत आलेले दर हे जास्तीचे आहेत. सन २००९-२०१० चे मा.स्थायी समिती सभेचे निर्णयाप्रमाणे सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाकरिता मागविण्यांत आलेल्या नारळी, खराटे, मोलाचे कुंचे, पंरवाकृती गोलाकर, झाडू खरेदी कामी आलेले दर हे कमी आहेत.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- दर जास्तीचे आहेत तो फरक किती आहे.

मा.उपायुक्त(कर)डॉ.श्री. जावळे साहेब :- सन २००९-१० चे दरापेक्षा सन २०१०-२०११ चे दर हे रूपये चार ने कमी आहेत.

स्टोअर विभाग प्रमुख श्री. जाधव :- सन २००९-२०१० करितांचे मागविण्यांत आलेले दर हे जास्तीचे असल्याने ते नामंजूर करण्यांत यावेत.

मा.श्री.गव्हाळे वि.ना. :- आलेले निविदा दर नामंजूर करावे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- आलेले निविदा दर जास्तीचे असल्याने नामंजूर करण्यांत यावे.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेस सन २००९-१० या आर्थिक वर्षासाठी नारळी खराटे, मोलाचे कुंचे इत्यादी खरेदी कामी मागविण्यांत आलेले निविदा दर हे जास्तीचे असल्याने ते सर्वानुमते नामंजूर करण्यांत यावेत.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेस सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिता नारळी खराटे, मोलाचे कुंचे,पंरवाकृती गोलाकार झाडू इ. खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे दरास मंजूरी मिळणेबाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार पुढिल प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक मे. स्वामी इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, अहमदनगर यांनी वाटाघाटी अंती कमी करून, दिलेले कमीचे दर हे जास्तीचे असल्याने नामंजूर करण्यांत येत आहेत.

नामंजूर निविदा दर धारक यांची टेंडर बयाना रिफंड करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

अनुमोदक :- मा.श्री.बारस्कर पोपट जगन्नाथ

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- १२७ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - १२७ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ६२ मधील केडगांव येथील हरिजन वस्ती मध्ये स्त्रिया व पुरूषाकरिता प्रत्येकी पांच सिटचे शौचालय बांधणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १४,३७,५४३/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग दि.२५/०८/२००९.

प्रशासकीय मान्यता प्रस्ताव

१] कामाचे नांव :- प्र.क्र. ६२ मध्ये केडगांव येथील हरिजनवस्ती येथे स्त्रिया व पुरूषांकरीता प्रत्येक ५ सिटचे शौचालय बांधणे.

२] प्रभाग क्रमांक :- ६२

३] सुचविणाराचे नांव :- मा.नगरसेवक श्री. रविंद्र कांबळे

४] लेखाशिर्ष :-
१] नांव : मागासवर्गीय कल्याणकारी योजना
२] तरतुद : रू. १,५०,००,०००/-
३] यापूर्वीचा खर्च : रू. ६०,२८,९१७/-
४] प्रस्तावीत खर्च : रू. १४,३७,५४३/-
५] एकुण खर्च : रू. ७४,६६,४६०/-
६] शिल्लक : रू.७५,३३,५४०/-

५] सद्यस्थिती : सदर ठिकाणी अस्तित्वात असलेली जूने शौचालय वापरणे योग्य नसून त्याची पडझड झालेली आहे. त्यामुळे तेथील नागरिकांना शौचालय नसल्याने नविन शौचालय बांधणे आवश्यक आहे.

६] प्रस्ताव : अ ] रस्ते : लांबी मीटर रूंद : मीटर
ब] पाईप लाईन : लांबी मीटर व्यास
क] गटर : लांबी
ड ] इमारतीचे क्षेत्रफळ :
इ] इतर
ई] या पूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष :

७] दरसुची : सा.बा.वि.-२००८-०९

८] अंदाजपत्रकीय रक्कम : रू.१४,३७,५४३/-

९] शाखा अभियंत्याचे नाव व सही : श्री. एस.आर. निंबाळकर sdxxx/-

१०] नगररचनाकार :- विषयाकिंत जागेवर विदयमान शौचालय असल्याचे दिसते (जुने पडीक) सबब या जागेवर आता नविन शौचालय बांधण्यास हरकत नाही. तथापि काम सुरू करण्यापूर्वी तपशीलवार आराखडे मंजूर करून घेणे आवश्यक आहे सदर प्रस्तावास या विभागाची हरकत नाही. दि. २/०३/१०

११] उपशहर अभियंता :- शाखा अभियंता यांच्या प्रस्तावान्वये मागासवर्गीय निधी अंतर्गत रक्कम रू.१४,३७,५४३=०० चे खर्चास मान्यता देणे योग्य दि. २/०३/१०

१२] शहर अभियंता :- अहवालानुसार रक्कम रू.१४,३७,५४३/- चे खर्चास प्रशासकीय मान्यतेस सादर. दि.२/०३/१०

१३] मुख्य लेखापरिक्षक :- प्र.क्र. ६२ मध्ये हरिजन वस्ती मध्ये ५ सिटचे शौचालय बांधणे अंदाजपत्रकीय रक्कम रू.१४,३७,५४३/- प्रशासकीय मान्यतेसाठी. दि.२/०३/१०

१४] मुख्य लेखाधिकारी :- मागासवर्गीय कल्याणकारी निधीतून रक्कम रू.१४,३७,५४३/- चे खर्चास प्रशासकीय मान्यतेस हरकत नाही. **/अ** दि.२/०३/१०

१५] मा.उपायुक्त साहेब :- **"अ"** प्रस्तावीतनुसार प्रशासकीय खर्च मंजूरीसाठी स्थायी समितीकडे शिफारस करून योग्य. दि. ०३/०३/१०

१६] मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. ९/०३/१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :-प्रभाग क्र.६२मधील केडगाव येथील हरिजनवस्तीमध्ये पुरूष व स्त्रियासाठी प्रत्येकी पांच सिटचे शौचालये बांधणेचे कामास व खर्चास प्रशासकीय मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. कांबळे र.द.:- केडगांव हरिजन वस्तीमधील सध्याचे पडीक संडासचे बांधकाम पाडून त्या जागेवर संडास बांधणेस व खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. लोंढे शि.बा. :- मागासवर्गीय कल्याण निधीची शिल्लक किती आहे. मागासवर्गीय कल्याण निधीमधून माझे वॉर्डात कामे का करीत नाहीत माझे प्रभागामध्ये मागासवर्गीय वस्ती आहे.

मा.श्री. कांबळे र.द. :- तेथे एकच घर आहे.

शहर अभियंता श्री. मगर ए.बी. :- मागासवर्गीयाकरीताचे राखीव वॉर्ड तसेच मागासवर्गीय नागरिक ज्या भागात जास्त आहेत. अशा वॉर्डमध्ये मागासवर्गीय कल्याण निधीमधून आवश्यक कामे केली जातात. सन २००९-१० चा निधी संपलेला असून सन-२०१०-२०११ चे मागासवर्गीय कल्याण निधीमधून आवश्यक कामे करता येतील.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- मा.सदस्या श्री.शिवाजी लोंढे यांचे वॉर्डमध्ये मागासवर्गीयांची वस्ती किती आहे. याची पहाणी करण्यांत यावी. मागासवर्गीय कल्याण निधी अंतर्गत तेथे आवश्यक कामे करता येतील किंवा कसे यांचा निर्णय घेवुन कामे करणेत येतील.

मा.श्री. कांबळे र.द. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत यावा.

मा.श्री. गव्हाळे वि.ना.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ६२ मधील केडगांव येथील हरिजन वस्ती मध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या पडीक संडासचे बांधकाम पाडून त्या जागेवर स्त्रिया व पुरूषाकरिता प्रत्येकी पांच सिटचे शौचालय बांधणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १४,३७,५४३/- (रूपये चौदा लाख सदतीस हजार पाचशे त्र्येचाळीस फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देणेत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. कांबळे रवी दगडू.

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- १२८ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - १२८ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे अखत्यारितील पिंपळगाव माळवी तलावाचे बुडीत क्षेत्रात आढाववाडी ता. नगर या गावाचे पिण्याचे पाण्या करिता विघंन विहिर घेणेस ना हरकत परवानगी देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- अ.नगर म.न.पा. पाणी पुरवठा जा.नं.१४५४ दि.१८/०३/१०

विषय-आढाववाडी ता.नगर या गावाकरीता महानगरपालिकेचे अखत्यारीतील पिंपळगाव माळवी तलावाचे बुडीत क्षेत्रात विंधन विहीर घेणेकरीता परवानगी मिळणेबाबत.

संदर्भ- मा.आमदार श्री. शिवाजीराव कर्डीले साहेब, यांचे दि. २७/१/२०१० चे पत्र.

मा.सादर,

उपरोक्त विषयाबाबत विनंती सादर की, मा. आमदार शिवाजीराव कर्डीले साहेब यांनी महानगरपालिकेस पत्र देवुन मौजे पिंपळगाव माळवी, ता. नगर जिल्हा- अहमदनगर अंतर्गत आढाववाडी ता.नगर या गावाकरीता पिण्याच्या पाण्याकरीता अहमदनगर महानगरपालिकेच्या अखत्यारीतील पिंपळगाव माळवी तलावामध्ये विंधन विहीर घेणेकरीता परवानगी मिळावी. यामुळे आढाववाडी गावचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मिटेल असे पत्रात नमूद केलेले आहे.

मा.आमदार श्री. शिवाजीराव कर्डीले साहेब यांचे संदर्भीय पत्रातील नमूद मागणी व अहमदनगर महानगरपालिकेच्या पिंपळगाव माळवी येथील तलावाची सद्यस्थिती विचारात घेता, सन १९८२ पासून सदर तलावातील पाण्याचा पिण्यासाठी तत्कालीन नगरपालिका व महानगरपालिकेमार्फत वापर केलेला दिसून येत नाही. सद्यस्थितीतही या तलावाच्या पाण्याचा कोणताही वापर महानगरपालिकेमार्फत करण्यांत येत नाही. तथापी मा.आयुक्त साहेब यांचे प्रशासकीय मंजुरीने व मान्यतेने सदर तलावाचे बुडीत क्षेत्रात सुमारे ५० ते ६० शेतक-यांनी शेतीसाठी महानगरपालिकेचे परवानगीने पाणी उचलेले असून शेतीसाठी पाण्याचा वापर करीत आहेत व नियमानुसार महानगरपालिकेकडे पाणीपट्टीचा भरण करीत आहे.

तसेच सदर तलावाचे बुडीत क्षेत्रात मौजे डोंगरगण व मौजे मांजरसुंबा तालुका-नगर गावाकरीता सार्वजनिक पिण्याच्या पाण्यासाठी उद्‌भव विहीर घेण्यास, उद्‌भव विहीरीच्या जागेचे आकारानुसार वार्षिक भाडे, संबधीत गावाची एकूण लोकसंख्या इ. विचारात घेवुन एक वर्षाची आगावू पाणीपट्टीची आकारणी करणे, तसेच सदर विहीरीचे पाणी मीटरद्वारे पाटबंधारे विभागाकडील शासनाचे दराप्रमाणे पुरविणेकामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ मधील नगरपालिकेच्या मालमत्तेचा विनीयोग कलम ७९ [ब] अन्वये सदर जागेवरील महानगरपालिकेचा मालकी हक्क अबाधीत ठेवून, मा.स्थायी समितीने पारित केलेल्या ठरावातील अटी व शर्तीनुसार मंजूरी देण्यांत आलेली आहे.

तसेच महानगरपालिकेच्या वरील नमूद तलावा क्षेत्रातून विंधन विहिरीसाठी अदयाप परवानगी दिलेली नाही.

परंतु मा.आमदार महोदयांच्या पत्रानुसार आढाववाडी गावासाठी पिण्याच्या पाण्याकरीता पिंपळगाव माळवी तलाव क्षेत्रात विंधन विहिर घेण्याची आवश्यकता विचारात घेता त्यांना त्यांचे मागणीनुसार परवानगी देता येईल.तथापी विंधन विहिरीस मंजूरी देणेपूर्वी विंधन विहीरीचे काम कोणत्या योजनेतून होणार आहे, असल्यास संबधीत विभागाची / खात्याची परवानगी दिलेली परवानगी, मा. शासनाच्या भूजल विभागाची परवानगी, विंधना विहिरीसह पंपगृहाकरीता आवश्यक जागेचा तपशील व राष्ट्रीय जनगणनेनुसार सदर गावाची लोकसंख्या इ. बाबत सदर ग्रामपंचायतीकडून सविस्तर माहिती उपलब्ध करून घेवून पुढील कार्यवाही करणे उचित राहील.

तथापी आपले आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग श्री. व्ही.ए. ढगे, लिपीक यांचा अहवाल असे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख :- संबंधीत ग्रामपंचायती कडून प्राथमिक माहिती मागविणे योग्य वाटते. व त्यानंतर सविस्तर फेर सादर अहवाल सादर करता येईल मान्यतेस्तव सादर. /**अ** दि.१८/०२/१०

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- शासन परिपत्रक / निर्देश असल्यास त्यासह सादर करा. दि.२०/०२/१०

--**--

अहमदनगर महानगरपालिका

पाणी पुरवठा विभाग दि.०६/०३/२०१०

विषय- आढाववाडी ता.नगर या गावाकरीता महानगरपालिकेचे अखत्यारीतील पिंपळगाव माळवी तलावाचे बुडीत क्षेत्रात विंधन विहीर घेणेकरीता परवानगी मिळणेबाबत.

संदर्भ :- सरपंच, ग्रामपंचायत, पिंपळगाव माळवी, ता.नगर यांचे दि.०३/०३/२०१० चे पत्र.

मा. फेरसादर,

उपरोक्त विषयाबाबत विनंती सादर की, मा. आमदार शिवाजीराव कर्डिले साहेब यांचे पत्रानुसार आढाववाडी गावासाठी पिण्याच्या पाण्याकरीता पिंपळगाव माळवी तलाव क्षेत्रात विंधन विहिर घेण्याची आवश्यकता विचारात घेता त्यांना त्यांचे मागणीनुसार परवानगी देता येईल. तथापी विंधन विहिरीस मंजूरी देणेपूर्वी विंधन विहीरीचे काम कोणत्या योजनेतून होणार आहे, असल्यास संबधीत विभागाची / खात्याची परवानगी दिलेली परवानगी, मा. शासनाच्या भूजल विभागाची परवानगी, विंधनविहिरीसह पंपगृहाकरीता आवश्यक जागेचा तपशील व राष्ट्रीय जनगणनेनुसार सदर गावाची लोकसंख्या इ. बाबत सदर ग्रामपंचायतीकडून सविस्तर माहिती उपलब्ध करून घेवुन पुढील कार्यवाही करणे उचित राहील. अशा आशयाच्या सादर प्रस्तावामध्ये मा.उपायुक्त (सा.) यांनी शासन परिपत्रक / निर्देश असल्यास त्यासह सादर करा असे निर्देशित केलेले आहे.

या अनुषंगाने सरपंच, ग्रामपंचायत, पिंपळगाव माळवी, ता.नगर यांचे दि.०३/०३/२०१० रोजी पत्र प्राप्त झालेले असून त्यामध्ये त्यांनी तलावामध्ये त्यांना नविन विंधन विहीर घेण्यासाठी महानगरपालिकेचा ना-हरकत दाखला मिळावा. अशी विनंती केलेली आहे.

तसेच पत्रासोबत त्यांनी १) ग्रामपंचायतीचा दि.१८/२/२०१० रोजीच्या ठरावाची नक्कल/ झेरॉक्स, २) जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकाीर कार्यालय, अहमदनगर यांचेकडील सन २००९-१० या आर्थिक वर्षासाठी आमदारांचा विकास कार्यक्रमाअंतर्गत कामाचे अंदाजपत्रक सादर करणे बाबत कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना अग्रेषित पत्राची झेरॉक्स प्रत, ३) सहा. भू वैज्ञानिक, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचे ना हरकत पत्राची झेरॉक्स प्रत, ४) प्रस्तावीत योजनेचा नकाशा इत्यादी कागदपत्रे इकडेस सादर केलेली आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता सदरचे काम हे सन २००९-१० या आर्थिक वर्षासाठी आमदारांचा विकास कार्यक्रमाअंतर्गत निधीमधून, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेमार्फत प्रस्तावीत केल्याचे व त्यास सहा. भू. वैज्ञानिक, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद, अहमदनगर समंती दिलेली असल्याचे दिसून येते.

यास्तव पिंपळगाव माळवी तलावाचे बुडीत क्षेत्रात डोंगरगण व मांजरसुंबा गावाकरीता सार्वजनिक पिण्याच्या पाण्यासाठी उद्भव विहीर घेण्यास महानगरपालिका मा.स्थायी समिती यांचे मंजूरीने तसेच मा. नगरचनाकार महानगरपालिका यांचे अभिप्रायानुसार सदर तलावातील उद्भव विहीरीच्या जागेचे विहीरीच्या आकारानुसार वार्षिक भाडे तसेच संबधीत गावाची एकूण लोकसंख्या विचारात घेवुन एक वर्षाची आगावू पाणीपट्टीची आकारणी करण्यांत येवुन सदरची योजना ही सार्वजनिक पिण्याच्या पाण्यासाठी असल्याने सदर तलावाचे बुडीत क्षेत्रात विंधन विहीर घेणेसाठी तसेच सदर विंधन विहीरीचे पाणी मीटरद्वारे पाटबंधारे विभागाकडील शासनाचे दराप्रमाणे पुरविणेकामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ मधील नगरपालिकेच्या मालमत्तेचा विनीयोग कलम ७९ [ब] अन्वये सदर जागेवरील महानगरपालिकेचा मालकी हक्क अबाधीत ठेवून तसेच महानगरपालिका मा.स्थायी समितीचे मंजूरीने तसेच महानगरपालिकेचे अटी व शर्तीनुसार ना हरकत परवानगी देणे उचित वाटते. **/अ**

तथापी आपले आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग श्री. व्ही.ए. ढगे, लिपीक यांचा अहवाल असे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख :- अहवालानुसार मंजुरीस्तव फेर सादर. दि.१०/०३/१०

मा.उपायुक्त (सा.)साहेब :-"**अ**" प्रस्तावीत नुसार मा.स्थायी समितीकडे मंजुरीसाठी पाठविणे करिता मान्यतेस्तव सादर. दि.११/०३/१०

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. १८/०३/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे पिंपळगाव माळवी तलावाचे बुडीत क्षेत्रात आढाववाडी या गावाचे पिण्याचे पाण्याकरिता विंधन विहिर घेणेस ना हरकत परवानगी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. लोंढे शि.बा. :- भविष्यात आपणांस पिंपळगाव तलावतील पाण्याची आवश्यकता नाही का?

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- आपण त्यांना ११ महिन्यांचे कराराने पिण्याचे पाण्याकरिताचे वापरासाठी विंधन विहिर घेण्यांस अटी / शर्ती वर ना हरकत देणे आहे.

मा.श्री. कांबळे र.द. :- पाणी पिण्यासाठी वापरणार असलेने ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे अखत्यारीतील पिंपळगाव तलावाचे बुडीत क्षेत्रात आढाववाडी या गांवाचे पिण्याचे पाण्याकरिता विंधन विहिर घेणेस ना हरकत परवानगी देणेस सर्वानमुते मंजूरी देण्यांत यावी ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

**<u>ठराव :</u>**-अहमदनगर महानगरपालिकेचे अखत्यारितील पिंपळगाव माळवी तलावाचे बुडीत क्षेत्रात आढाववाडी ता. नगर या गावाचे पिण्याचे पाण्या करिता विघंन विहिर घेणेस महानगरपालिकेच्या अटी / शर्तीस अधिन राहून ना हरकत परवानगी देणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत

अनुमोदक :- मा.श्री . कांबळे रवी दगडू.

ठराव सर्वानमुत मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

विषय क्रमांक- १२९ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

ठराव क्रमांक - १२९ बुधवार दिनांक ३१/०३/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३१ दिनांक २८/७/२००९ अन्वये अहमदनगर महानगरपालिका हद्दीत नव्याने शहर वाहतुक बससेवा सुरू करणे कामी नेमलेल्या अभ्यास समितीने सादर केलेल्या अहवालासह बससेवा सुरू करणेबाबत अंतिम निर्णय घेणे करिता पूर्वीचे प्रस्तावासह ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- अहमदनगर महानगरपालिका मो.व्हे.वि./ ३६९ दि.२३/०३/२०१०

प्रति,
मा.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

विषय :- शहर बससेवा सुरू करणे बाबत.
संदर्भ :- १] मा.स्थायी समिती ठराव क्र.३१ दि.२८/७/०९
२] मा.स्थायी समिती सदस्य, अभ्यास समितीचे पत्र दि.२०/०३/२०१०

मा.सादर,

अहमदनगर महानगरपालिकेने नव्याने शहर बससेवा सुरू करणेकामीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे देण्यात आलेला आहे. त्यावर स्थायी समितीने ठराव क्र.३१ दि. २८/७/०९ अन्वये अभ्यास समिती नेमली आहे. सदर समितीने मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली मा.सभापती स्थायी समिती व नगरसेवक सर्वश्री गव्हाळे विजय, पवार बाळासाहेब , बारस्कर पोपट यांनी औरंगाबाद महानगरपालिका येथील बससेवेचा अभ्यास करून संदर्भिय पत्र दिलेले आहे.

संदर्भिय पत्रात औरंगाबाद महानगरपालिका व अहमदनगर महानगरपालिका यांच्या बससेवेबाबतच्या अटी / शर्ती संयुक्तीक आहेत. त्यामुळे आता इतर महानगरपालिकेची [उदा. सांगली, सातरा, कोल्हापूर] येथील बससेवेचा अभ्यास करणेची आवश्यकता नाही व अभ्यास पाहणी समितीच्या अहवालानुसार मा.सभापती यांनी पुढील कार्यवाही करावी व असलेल्या तीन निविदा धारकापैकी [१] सोलापूर महानगरपालिका, परिवहन उपक्रम, सोलापूर. [२] लोककार्य व लोकक्रांती दल, महाराष्ट्र राज्य, [३] प्रसन्ना ट्रव्हल्स प्रा.लि. पुणे, या निविदाधारकापैकी निरंक या संस्थेस बससेवा चालविणेस देणेबाबत शिफारस करीत आहे. परंतु याबाबत मा.स्थायी समितीमध्ये अंतीम निर्णय घेण्यात यावे असे नमूद केलेले आहे. [सोबत पत्र अहवाल]

मा.स्थायी समिती ठराव क्र.३१ दि.२८/७/०९ तसेच अभ्यास पाहणी समिती अहवाल दि.२०/३/२०१० नुसार शहर बससेवेबाबतचा अंतीम निर्णय घेणेकामी पुन्हा यापूर्वीचा प्रस्तावासह हा अहवाल मा.स्थायी समिती समोर ठेवावा, ही विनंती.

येणे प्रमाणे मेकॅनिकल इंजिनिअर यांचा अहवाल असे. २३/३/१०
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३१ दिनांक २८/७/२००९ अन्वये अहमदनगर महानगरपालिका हद्दीत नव्याने शहर वाहतुक बससेवा सुरू करणे कामी नेमलेल्या अभ्यास समितीने सादर केलेल्या अहवालासह बससेवा सुरू करणेबाबत अंतिम निर्णय घेणे करिता पूर्वीचे प्रस्तावासह ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये शहर बस सेवा सुरू करणे कामी अंतिम निर्णय घेणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- प्रस्तावाची माहिती मा.सभेस देण्यात यावी.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने बससेवा सुरू करणे करिता आलेल्या गोपनीय प्रस्तावावर निर्णय घेणे कामी प्रस्ताव मा.स्थायी समितीचे मंजूरीसाठी सादर केला असता मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३१ दिनांक २८/७/२००९ अन्वये मा. महापौर, अहमदनगर महानगरपालिका व मा.सभापती ,स्थायी समिती, अहमदनगर महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली मा.स्थायी समिती सदस्यांची अभ्यास समिती स्थापन करणेस व बस समितीने बससेवा चालविलेल्या महानगरपालिकाचा अभ्यास करून अटी / शर्ती ठरवून, अभ्यास पूर्ण कार्यवाही करून निर्णय घेवुन बससेवा सुरू करणे बाबत ठराव पारित करण्यांत आला होता. मा.स्थायी समितीने नेमलेल्या अभ्यास समितीने औरंगाबाद महानगरपालिका व अहमदनगर महानगरपालिका यांच्या बससेवे बाबतच्या अटी / शर्ती संयुक्तीक असल्याने आता इतर महानगरपालिकांचे बससेवेचा अभ्यास करणेची आवश्यकता नसून आलेल्या तीन निविदा धारकांपैकी निरंक या संस्थेस शहर बस वाहतुक चालविण्यांस देणे बाबत शिफारस करीत आहे. अशा बाबत अहवाल दिलेला आहे.

मा.उपायुक्त (कर) डॉ.श्री. जावळे साहेब :-मा.अभ्यास कमेटीने दिलेला अहवाल सभेमध्ये वाचून दाखविण्यांत यावा.

त्याप्रमाणे मा.स्थायी समिती ठराव नं. ३१ दि. २८/७/२००९ अन्वये नेमलेल्या अभ्यास समितीने दिलेला अहवाल सभेमध्यें वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- मागील वेळी बससेवा चालू रहाणेसाठी अभिकर्ता संस्थेस पैसे दिले होते.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- त्यांचेच डिपॉझिट मधील रक्कम त्यांना देण्यांत आली होती.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेमार्फत शहर वाहतुक बससेवा सुरू करणे गरजेचे असल्याने अभ्यास समितीने बससेवा चालू करणे बाबत सांगोपांग विचार केलेला असून आलेल्या तीन निविदा पैकी प्रसन्ना ट्रॅव्हल्स,प्रा.लि.,पुणे यांना बससेवा सुरू करणे कामी अभिकर्ता म्हणून नेमणेस मंजूरी देण्यात यावी असे ठरविलेले आहे. बससेवे संबंधी अटी / शर्ती महानगरपालिकेचे विधी सल्लगार यांचा सल्ला घेवुन ठरविण्यांत याव्यात.

मा.श्री.गव्हाळे वि.ना. :- बससेवा चालू करणे संबंधी ठरविल्या नुसार प्रसन्ना ट्रॅव्हल्स, प्रा.लि.,पुणे यांची अभिकर्ता म्हणून नेमणूक करणेस मंजूरी देण्यांत यावी. अटी / शर्ती ठरविणेत याव्यात. बससेवा पंधरा दिवसात सुरू करावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- अभिकर्ता म्हणून प्रसन्ना ट्रॅव्हल्स प्रा.लि. पुणे यांची नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यांत यावी. तसेच शहर वाहतुक बससेवा सुरू करणे कामी म.न.पा.चे विधी सल्लागार यांचे सल्याने अटी / शर्ती तयार करून अटी / शर्ती मान्यतेसाठी मा.स्थायी समिती कडेस सादर कराव्यात. पंधरा दिवसामध्ये अटी / शर्ती ठरवून बससेवा सुरू करणेची कारवाई पूर्ण करण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीत नव्याने शहर वाहतुक बस सेवा सुरू करणे कामी प्रसन्न ट्रॅव्हल्स,प्रा.लि.पुणे यांची अभिकर्ता म्हणून नेमणूक करणेस मंजूरी देण्यांत यावी. अटी / शर्ती ठरवून मा.स्थायी समितीकडेस मान्यते साठी सादर कराव्यात.अभिकर्ता संस्थेशी करारनामा करून बससेवा सुरू करणे कामी आवश्यक ती कार्यवाही करण्यांत येवुन १ मे रोजी महाराष्ट्र दिनी बससेवा सुरू करणेत यावी.

**<u>ठराव :-</u>** मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३१ दिनांक २८/७/२००९ अन्वये अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने शहर वाहतुक बससेवा सुरू करणे कामी नेमण्यांत आलेल्या अभ्यास समितीचा अहवाल व प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर सांगोपाग विचार विनियम करून पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

(१) अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने शहर वाहतुक बससेवा सुरू करणे कामी प्रसन्ना ट्रॅव्हल्स, प्रा.लि. पुणे यांची अभिकर्ता संस्था म्हणून नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

(२) अहमदनगर महानगरपालिकेचे विधी सल्लगार यांचे सल्ल्याने अहमदनगर शहर वाहतुक बससेवेच्या अटी / शर्ती तयार करणेत येवुन त्या मा.स्थायी समिती सभेकडेस मंजूरीसाठी सादर करण्यांत याव्यात.अभिकर्ता संस्थेशी करारनामा करून बससेवा सुरू करणे कामी आवश्यक ती कार्यवाही करण्यांत येवुन महाराष्ट्र दिनी १ मे रोजी बससेवा सुरू करणेत यावी.

नामंजूर निविदाकार यांची टेंडर बयाना रक्कम रिफंड करणेस मंजूरी देण्यांत येत आहे, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.